दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

जीवे मारण्याची धमकी देत घरातील साहित्याची तोडफोड

वर्धा : जीवे मारण्याची धमकी देत घरात प्रवेश करून साहित्याची तोडफोड केली. ही घटना तक्षशिला नगर सावंगी (मेघे) परिसरात ९ ऑगस्ट रोजी घडली. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून सावंगी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

तक्षशिला नगर येथील महिलेला घरातील साहित्याची तोडफोड केली असून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. महिलेने घरी बघितले असता घरातील एलईडी टिव्ही, हॉलमधील सिलिंग झुमर, घराच्या खिडकीच्या काचा, कम्प्युटर, मॉनिटर, फ्रिजची तोडफोड केल्याचे दिसले. दोन दुचाकी, कुलर, ट्रकचीही तोडफोड करत सुमारे ४ लाख रुपयांचे नुकसान केले. याप्रकरणी तक्रारीवरून अनास समिर पठाण, अरमान समिर पठाण दोन्ही रा. स्टेशनफैल व एका अनोळखी इसमाविरोधात सावंगी (मेघे) पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

*(आष्टी) वर्धा *मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६ *वर्ष ४ थे *अंक २०९ *पृष्ठ ६ *मुल्य ५.०० RNI No.:

महिला बचतगटांच्या उत्पादनांना वर्षभर बाजारपेठ उपलब्ध होणार : ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

उमेद मॉल मंजूर केल्याबद्दल मंत्री जयकुमार गोरे यांचा उमेदच्या महिलांतर्फे सत्कार प्रत्येक जिल्ह्यात महिला बचत गटांचा स्वतःच्या मालकीचा 'उमेद मॉल' उभारणार



वर्धा (जिमाका) : ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांच्या उत्पादनांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात्या टिकाणी 'उमेद' मॉल उभारण्यात येणार आहे. या माध्यमातून महिलांनी तयार केलेल्या वस्तू व उत्पादनांच्या विक्रीसाठी वर्षभर बाजारपेठ उपलब्ध होणार असल्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात महिला बचत गटांच्या स्वप्नांना भरारी व कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, आमदार समीर कुणावार, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक वैशाली रसाळ यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला उमेदच्यावतीने वर्धा येथे उमेद मॉल मंजूर केल्याबद्दल ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे व पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांचा सत्कार करण्यात आला.

देशाच्या एकूण लोकसंख्येत महिलांचा वाटा जवळपास निम्मा आहे. महिला सक्षम झाल्याशिवाय विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात असून उमेदच्या माध्यमातून ग्रामीण महिलांच्या पंखांना बळ देण्याचे काम सुरू आहे. बचत गटांच्या माध्यमातून लाखो महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या असून त्यांनी स्वतःचे विश्व निर्माण केले आहे, असे श्री. गोरे म्हणाले.

प्रधानमंत्री आवास योजनेतील घरांवर सौर पॅनेल बसविण्याचे मोठे काम बचतगटांच्या महिलांना देण्याचे प्रस्तावित आहे. राज्यात सुमारे ३० लाख सोलर पॅनेल बसविण्याचे उद्दिष्ट असून, या कामात बचत गटांना सहभागी करून घेण्यात येणार आहे. महिलांनी मागणी केलेल्या प्रमाणात त्यांना काम उपलब्ध करून देण्याची ग्वाही मंत्री श्री.गोरे यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ग्रामीण महिलांना अधिक सक्षम करण्यासाठी विविध निर्णय घेण्यात आले आहेत. घरकुलासाठी मिळणाऱ्या अतिरिक्त अनुदानातून सौर ऊर्जेसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबतही निर्णय घेण्यात आल्याचे ते म्हणाले.

पुढे बोलतांना श्री. गोरे म्हणाले, देशातील लखपती दीदींच्या उद्दिष्टात महाराष्ट्राचा मोठा वाटा असून राज्यात ५० लाख महिलांना लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी बचत गटांची संख्या वाढवून अधिकाधिक महिलांना उमेदच्या माध्यमातून जोडण्यात यावे. महिला बचत गटांना आतापर्यंत सुमारे ५० हजार कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले असून महिलांनी कर्जाची परतफेड अत्यंत प्रामाणिकपणे केली आहे, असे ग्रामविकास मंत्री म्हणाले. यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याहस्ते उमेदच्या प्रभाग संघांना समुदाय गुंतवणूक निधीचे तसेच स्वयं सहाय्यता समूहांना बँक लिंकेज निधीचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी उमेद अभियानाच्या जिल्ह्यातील कामाचा आढावा सादर केला. यावेळी उमेद महिला गटांच्या सदस्य संगिता गायकवाड, कल्पना बन्साोड, लक्ष्मी शेंडे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन पल्लवी पुरोहित यांनी केले तर आभार निरज नखाते यांनी मानले. कार्यक्रमास उमेदच्या महिला बचत गटांच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

गटांच्या उत्पादनांची गुणवत्ता उत्तम दर्जाची असावी : पालकमंत्री डॉ. पंकज भोयर

महिला बचतगटांनी मोठ्या मेहनतीने उद्योग उभे केले आहेत. त्यांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी उत्पादनांची गुणवत्ता बाजारपेठेतील उत्पादनांशी स्पर्धा करणारी असणे आवश्यक आहे. त्यासोबतच प्रभावी मार्केटिंगचे नियोजनही गटाने करणे गरजेचे आहे. वायगावची हळद ही वर्धा जिल्ह्याची विशेष ओळख असून महिला बचत गटांच्या माध्यमातून तिचे उत्पादन केले जात आहे. सुमारे सहा महिन्यांपूर्वी वायगावची हळद दुबईला निर्यात करण्यात आली. अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्याची उत्पादने केवळ गुणवत्तेमुळे नव्हे, तर प्रभावी मार्केटिंगमुळे बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर पोहोचतात. त्यामुळे महिला बचत गटांनीही उत्पादनाची गुणवत्ता आणि मार्केटिंग या दोन्ही बाबींवर नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे, असे आवाहन पालकमंत्री डॉ. भोयर यांनी केले. तसेच वर्धा जिल्ह्यासाठी ओमेद मॉल मंजूर झाल्याबद्दल ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे पालकमंत्री डॉ. भोयर यांनी आभार मानले.

हिंगणघाट बाजार समितीचा आदर्श इतर बाजार समित्यांनी घ्यावा : ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

लिलाव शेडचे भूमीपूजन व साहित्याचे वितरण पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांची उपस्थिती



वर्धा (जिमाका) : अलीकडे सहकारी संस्थांकडे शेतकऱ्यांचा पाहण्याचा दृष्टीकोण बदलत चालला आहे. अशा स्थितीत विदर्भातील सहकार चळवळीला पुढे नेण्याचे काम हिंगणघाट बाजार समिती करत आहे. या समितीच्यावतीने शेतकऱ्यासाठी विविध योजना व सामाजिक उपक्रम राबवून शेतकरी हिताचे काम केले जात आहे. हिंगणघाट समितीचा आदर्श इतर बाजार समित्यांनी घ्यावा, असे प्रतिपादन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

हिंगणघाट कृषि उत्पन्न बाजार समितीच्यावतीने लिलाव शेडचे भूमीपूजन, विविध योजनेतर्गत बैल मृत्यु व आगग्रस्त शेतकरी कुटुंबांना धनादेश वितरण, लॅपटॉप वितरण, जिल्हा परिषद शाळांना सिलींग फॅन वितरण तसेच डिजीटल इंटर ?क्टीव्ह पॅनलचे वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्री. गोरे बोलत होते. कार्यक्रमाला पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, आमदार समीर कुणावार, हिंगणघाट कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती ?ड.सुधीर कोठारी, माजी आमदार राजु तिमांडे, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रविण देशमुख, वर्धा समितीचे अध्यक्ष अमितगावंडे, आर्वीचे संदीप काळे, समुद्रपूरचे हिम्मत चतुर, सिंदी रेल्वेचे केशरीचंद खंगोरे, आष्टीचे राजेंद्र खवशी, हिंगणघाट बाजार समितीचे उपसभापती हरीष बडतकर आदी उपस्थित होते.

पश्चिम महाराष्ट्रातील सहकार चळवळ जोमाने वाढल्यामुळे तेथील सहकार क्षेत्राचा मोठा विकास झाला आहे. विदर्भातील चळवळ नावापुरती राहिली असतांना हिंगणघाट बाजार समितीने शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यासोबतच समितीचा वार्षिक नफा मिळविण्यात विदर्भातच नव्हे तर राज्यात स्थान मिळविले आहे. समितीची ही कामगिरी कौतुकास्पद आहे. शेतकऱ्यांना त्यांचा शेतीमाला खुल्या बाजारपेठेत नेण्यास राज्य शासनाने अधिकार दिला असतांना सुध्दा हिंगणघाट बाजार समितीवर विश्वास ठेवून बाजार समितीत शेतकरी शेतमाल विक्रीस आणतात, ही कौतुकाची बाब आहे. राज्य शासनाने शेतकऱ्यांचे वीजबिल माफ करून पुढील पाच वर्ष शून्य बिल करण्याच्या निर्णयासोबतच शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी केली असल्याचे पुढे बोलतांना जयकुमार गोरे म्हणाले.

सहकार क्षेत्राच्या विकासासाठी केंद्रात स्वतंत्र सहकार विभाग : डॉ.पंकज भोयर

मागील काही वर्षांपासून हिंगणघाट बाजार समितीच्यावतीने शेतकऱ्यांसाठी सामाजिक हिताच्या विविध योजना व उपक्रम राबविले जात आहे. हे कार्य कौतुकास्पद आहे. पश्चिम महाराष्ट्रात सहकाराचे मोठे जाळे आहे. तेवीस सहकारी संस्थाचा विकास मोठ्या प्रमाणात होत आहे. पंरतू विदर्भ यामध्ये मागे आहे. केंद्र शासनाने सहकाराचे महत्व ओळखून स्वतंत्र सहकार विभागाची निर्मिती केली. सहकारी संस्थांचे बळीकटीकरण करण्यासाठी विविध योजना राबविण्याचा निर्णय घेऊन या क्षेत्राला नवसंजीवनी देण्याचे काम हाती घेतले आहे. हिंगणघाट बाजार समितीने शेतकऱ्यांचा मालासाठी गोदामाची निर्मिती केली. सवलतीच्या दरात माल गोदामात ठेवण्याची सुविधा दिली. समितीच्यावतीने नव्याने कोल्ड स्टोरेजची उभारणी करण्यात येत असून यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले.

समुद्रपुर व हिंगणघाट बाजार समितीत शेतकरी भवनसाठी निधी मंजूर : आ.समिर कुणावार

हिंगणघाट बाजार समिती ही जिल्ह्यातच नव्हे राज्यात ख्याती प्राप्त आहे. विदर्भात कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतल्या जात असतांना जिल्ह्यातील नव्हे तर लगतच्या जिल्ह्यातील सुध्दा शेतकरी आपला कापूस विक्रीसाठी हिंगणघाट येथे आणतात. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या विकासासाठी सदैव प्रयत्नरत राहू. समुद्रपूर व हिंगणघाट बाजार समितीमध्ये शेतकरी भवन निर्माण करण्यासाठी राज्य शासनाकडून प्रती शेतकरी भवन १ कोटी २५ लक्ष रुपये मंजूर करण्यात आले असल्याचे यावेळी आमदार समीर कुणावार यांनी सांगितले. यावेळी अँड. सुधीर कोठारी यांनी आपल्या प्रास्ताविकात हिंगणघाट कृषि उत्पन्न बाजार समितीच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या विविध योजना व उपक्रमाची माहिती दिली. यावेळी मान्यवरांच्याहस्ते शेतकरी पाल्यांना लॅपटॉप तसेच विविध साहित्याचे वितरण करण्यात आले. तत्पुर्वी ग्रामविकास मंत्री, पालकमंत्री, आमदार व इतर मान्यवरांच्याहस्ते बाजार समितीच्या लिलाव शेडचे कुदळ मारुन भूमीपूजन करण्यात आले. कार्यक्रमाला, हिंगणघाट बाजार समिती, समुद्रपूर बाजार समितीचे संचालक, तसेच शेतकरी, नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

वर्ध्यात आज 'शिक्षण उत्सव'

- अध्ययन निष्पत्ती व शालेय स्पर्धा परीक्षा विषयावर होणार गटचर्चा

वर्धा : शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय आणि प्रभावी काम करणाऱ्या शिक्षकांच्या कार्याची दखल घेत, त्यांच्या अनुभवांची देवाणघेवाण घडवून आणत

जिल्ह्यातील शिक्षण व्यवस्थेला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने वर्धेतील द ब्रँड हेरिटेज येथे आज मंगळवारी ११ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता शिक्षण उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.


या शिक्षण उत्सवात वर्धा जिल्ह्यातील आठही तालुक्यांमधील सुमारे १०० उत्कृष्ट कामगिरी करणारे शिक्षक सहभागी होणार आहेत. यासोबतच केंद्रप्रमुख, विषय साधनव्यक्ती, विस्तार अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांचीही उपस्थिती राहणार आहे. आपल्या कार्यातील अनुभव, नाविन्यपूर्ण उपक्रम, प्रभावी अध्यापन पद्धती तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केलेल्या प्रयत्नांची देवाणघेवाण या कार्यक्रमाच्या माध्यमातून केली जाणार आहे. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सीमा पाटील, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) डॉ. जयश्री धारफळकर, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)डॉ. महेंद्र गजभिये, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) ज्ञानेश्वर पानसरे, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) रुपेश कांबळे यांच्यासह जिल्ह्यातील आठही तालुक्यांचे गटशिक्षणाधिकारी सहभागी होणार आहेत.

किटकनाशक गिळून वयोवृद्धेची आत्महत्या

वर्धा : वयोवृद्ध महिलेने किटकनाशक गिळून आत्महत्या केली. ही घटना लोणसावळी येथे घडली असून या प्रकरणी पुलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे. वेच्छला लक्ष्मण राऊत (वय ८०) रा. लोणसावळी असे मृत महिलेचे नाव आहे. वेच्छला यांनी किटकनाशक गिळल्याचे लक्षात येताच त्यांना सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे तपासणीअंती डॉक्टरांनी वेच्छला यांना मृत घोषित केले.

मृत शेतकऱ्यांच्या वारसांची नोंद करून कर्जमाफीचा लाभ द्या

खासदार अमर काळे यांची अमरावती व वर्धा जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी; गावपातळीवर शिबिरे आयोजित करण्याची सूचना



वर्धा : महाराष्ट्र शासनाने नुकतीच सावित्रीबाई फुले शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. मात्र, कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियेत अनेक अडचणी निर्माण होत असल्याने पात्र शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. विशेषतः मृत शेतकऱ्यांच्यावारसांची नोंद न झालेली असणे, शेतकऱ्यांकडून केवायसी (ख्च्) प्रक्रिया पूर्ण न होणे तसेच बँक खात्याशी संबंधित अडचणी यामुळे कर्जमाफीचा लाभ मिळण्यात अडथळे येत आहेत. या पार्श्वभूमीवर वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर शरदराव काळे यांनी अमरावती व वर्धा जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन गावपातळीवर विशेष शिबिरे आयोजित करण्याची मागणी केली आहे.

खासदार काळे यांनी ७ ऑगस्ट २०२६ रोजी अमरावती व वर्धा जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठविले आहे. या पत्रात शेतकरी कर्जमाफी प्रकरणातील मृत शेतकऱ्यांच्या वारसांची नोंद करून त्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यासाठी गावपातळीवर शिबिरांचे आयोजन करण्याबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सावित्रीबाई फुले शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. कर्जबाजारीपणामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही योजना महत्त्वाची ठरणार आहे. मात्र, प्रत्यक्षात योजनेचा लाभ मिळवितांना प्रशासकीय व तांत्रिक स्वरूपाच्या अनेक अडचणी समोर येत असल्याचे खासदार काळे यांनी आपल्या पत्रातून जिल्हाधिकाऱ्यांचा निदर्शनास आणून दिले आहे.

विशेषतः मयत शेतकऱ्यांचे वारस न चढणे ही गंभीर समस्या असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या जमिनीवर किंवा संबंधित कागदपत्रांमध्ये वारसांची नोंद वेळेत न झाल्यास कर्जमाफीची प्रक्रिया अडचणीत येते. अनेक कुटुंबांमध्ये वारस नोंदणीची प्रक्रिया अपूर्ण असल्याने मयत शेतकऱ्यांच्या कर्जाचा प्रश्न कायम राहतो. परिणामी, शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेचा लाभ पात्र वारसदारांना मिळण्यात अडथळे निर्माण होतात.

यासोबतच शेतकऱ्यांनी केवायसी न करणे आणि बँक खात्याशी संबंधित अडचणी हीदेखील कर्जमाफीच्या मार्गातील महत्त्वाची कारणे असल्याचे खासदारांनी नमूद केले आहे. काही शेतकऱ्यांची आवश्यक कागदपत्रे अद्ययावत नसणे, केवायसी प्रक्रिया पूर्ण न झालेली असणे अथवा बँक खात्याशी संबंधित माहितीमध्ये त्रुटी असणे यामुळे पात्र असूनही कर्जमाफीचा लाभ मिळणे कठीण होते आहे.

या सर्व अडचणींचा थेट परिणाम शेतकरी कुटुंबांवर होत असून, 'वरेच शेतकरी कर्जमुक्तीच्या लाभापासून वंचित आहेत,' असे खासदार अमर काळे यांनी आपल्या पत्रात स्पष्ट केले आहे. त्यामुळे केवळ योजना जाहीर करून न थांबता, पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनेचा प्रत्यक्ष लाभ पोहोचविण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम राबविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे.

गावपातळीवर शिबिरांची मागणी

ही समस्या तात्काळ सोडविण्यासाठी गावपातळीवर विशेष शिबिरे आयोजित करावीत, अशी ठोस मागणी खासदार अमर काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. अशा शिबिरांच्या माध्यमातून मृत शेतकऱ्यांच्या वारसांची नोंद, केवायसी प्रक्रिया, बँक खात्याशी संबंधित त्रुटी आणि कर्जमाफीसाठी आवश्यक असलेल्या इतर कागदपत्रांची पूर्तता एकाच ठिकाणी करून देणे शक्य होईल.गावागावांत प्रशासनाची यंत्रणा पोहोचल्यास शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांना विविध कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची गरज कमी होईल. तसेच कागदपत्रांअभावी किंवा प्रक्रियेतील अडचणीमुळे कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या पात्र लाभार्थ्यांना दिलासा मिळू शकतो. त्यामुळे अशा शिबिरांचे आयोजन करून प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्याची मागणी खासदार काळे यांनी केली आहे.

शेतकरी कर्जमाफी ही केवळ शासनाची घोषणा न राहता तिचा लाभ शेवटच्या पात्र शेतकऱ्यापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. विशेषतः कर्जदार शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या कुटुंबावर आर्थिक संकट अधिक गडद होते. अशा परिस्थितीत वारसांना कर्जमाफीचा लाभ मिळाल्यास संबंधित कुटुंबाला मोठा आर्थिक आधार मिळू शकतो. त्यामुळे मृत शेतकऱ्यांच्या वारसांच्या प्रकरणांना प्राधान्य देऊन प्रशासनाने कार्यवाही करण्याची गरज आहे.

खासदार अमर काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केलेल्या या मागणीमुळे अमरावती व वर्धा जिल्ह्यातील कर्जमाफीच्या प्रक्रियेत अडकलेल्या शेतकरी कुटुंबांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. गावपातळीवर शिबिरे घेऊन वारस नोंदणी, केवायसी आणि बँक खात्याशी संबंधित अडचणी दूर केल्यास अनेक पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो.प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागांच्या समन्वयातून विशेष शिबिरांचे नियोजन करावे आणि कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या पात्र शेतकऱ्यांना तातडीने लाभ मिळवून द्यावा, अशी अपेक्षा खासदार अमर काळे यांनी व्यक्त केली आहे.

समृद्धी महामार्गावर वाहतूक विस्कळीत करणाऱ्या कंटेनर चालकावर कारवाई


सावंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल, वाहन परवाना व चालक अनुज्ञप्ती निलंबनाचा प्रस्ताव

वर्धा (जिमाका) : समृद्धी महामार्गावर वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या कंटेनर चालकावर परिवहन विभाग व पोलिस विभागाने संयुक्त कारवाई केली. मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या लेनवर कंटेनर आडवा उभा करून वाहतूक विस्कळीत केल्याप्रकरणी चालकाविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक ९ ऑगस्ट रोजी दुपारी समृद्धी महामार्गावरील आयसी-०४, वेळाकेळी येथे कंटेनर मोटार वाहन क्रमांक एचआर ५५ बीए ८५४४ चा चालक वाहन आडवे उभे करून वाहतुकीस अडथळा निर्माण करीत असल्याचे निदर्शनास आले. समृद्धी महामार्गावर वाहने ताशी १२० किलोमीटर वेगाने धावत असल्याने अशाप्रकारे वाहन उभे केल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे परिवहन विभाग आणि पोलिस विभागाने संयुक्तपणे कारवाई केली.उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, वर्धा यांच्याकडून वाहनावर मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम १९२ (अ) अंतर्गत कारवाई करण्यात आली. तसेच चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम विविध कलमांन्वये तसेच राष्ट्रीय महामार्ग कायदा १९५६ मधील कलम ८ व अन्वये पोलिस ठाणे सावंगी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समृद्धी महामार्गावर शासनाच्या निर्देशानुसार २४ तास शून्य अपघात मोहिमेतंर्गत तपासणी मोहिम राबविण्यात येत आहे. या तपासणीदरम्यान सदर कंटेनर नो पार्किंग मध्ये थांबलेला आढळला. चालकाचे समुपदेशन करून वाहन सुरक्षित ठिकाणी हलविण्याचा सूचना देण्यात आल्या. त्यानंतर वाहनाची कागदपत्रे व मालाचे टॅक्स इनव्हॉइस तपासले असता, वाहनातील माल नागपूर येथून पुणे येथे जात असल्याचे आढळले. सदर वाहन राष्ट्रीय परवान्याच्या अटी व शर्तीचे उल्लंघन करीत असल्याचेही तपासणीत निष्पन्न झाले. त्यामुळे वाहनावर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून चालकाची अनुज्ञप्ती (ड्रायव्हिंग लायसन्स) निलंबित करण्यासाठी संबंधित मुळ अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडे तसेच वाहनाचा परवाना निलंबित करण्यासाठी मूळ नोंदणी प्राधिकाऱ्याकडे प्रस्ताव पाठविण्यात येत आहे.समृद्धी महामार्गावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशाप्रकारे वाहन उभे करणे अथवा वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे टाळावे.

संपादकीय

चिपनिर्मितीत भारताची झेप



भारताने २०२१ मध्ये देशात ?'इंडिया सेमीकंडक्टर मिशन?'ची अधिकृत सुरुवात केली होती. आता या महत्त्वाकांक्षी मोहिमेला प्रभावी आयाम दिला गेला आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने अलीकडेच ?'सेमीकंडक्टर मिशन २.०?' ला अत्यंत महत्त्वपूर्ण मंजुरी दिली असून, यासाठी तब्बल १.२७ लाख कोटी रुपयांच्या प्रचंड रकमेची भरीव खात्रीशीर तरतूद केली गेली आहे. आपण यापूर्वीच्या ७६,००० कोटी रुपयांच्या मूळ कार्यक्रमाचा विचार केला, तर हा नवीन टप्पा त्याहून कितीतरी पटीने अधिक मोठा, विस्तृत आणि सर्वसमावेशक आहे. सरकारच्या या नव्या आणि विशाल धोरणाचा मुख्य उद्देश हा केवळ भारतात चिप्सचे फॅब्रिकेशन किंवा उत्पादन सुरू करणे एवढाच मर्यादित नाही, तर यामध्ये चिप्सची डिझाईन तयार करण्यापासून ते थेट त्यांचे शेकडो प्रकारांत परीक्षण, पॅकेजिंग, त्यासाठी लागणारी रसायने, विशिष्ट मशिनरी, संशोधन आणि या संपूर्ण क्षेत्रासाठी अत्यंत कुशल मानवी संसाधन तयार करून एक परिपूर्ण सेमीकंडक्टर पुरवठा साखळी भारतातच निर्माण करणे हा आहे.

डिसेंबर २०२१ मध्ये जेव्हा याची पहिली पायाभरणी झाली होती, तेव्हा जगभरात सेमीकंडक्टरची प्रचंड टंचाई होती. वाहन उद्योगापासून ते अगदी सामान्य इलेक्ट्रॉनिक्स आणि मोबाईल कंपन्यांपर्यंत सर्वांचेच उत्पादन या भीषण टंचाईमुळे विस्कळीत झाले होते. काही मोजके देशच सेमीकंडक्टरचे मोठे उत्पादक असल्यामुळे संपूर्ण जग पूर्णपणे त्यांच्याच कृपेवर आणि पुरवठ्यावर अवलंबून होते. याच ऐतिहासिक पेचप्रसंगातून मार्ग काढत भारत सरकारने भविष्यात कधीही अशा संकटाचा सामना करावा लागू नये म्हणून देशातच चिप उत्पादनाचा पाया रचण्याची मोहीम हाती घेतली. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती-तंत्रज्ञान मंत्रालयाच्या माहितीनुसार, या संपूर्ण मिशनचा मूळ उद्देश हा केवळ देशांतर्गत गरज भागवणे हा नसून, भारत देशाला जागतिक स्तरावर सेमीकंडक्टर उत्पादनाची अत्यंत महत्त्वाची आणि भक्कम महाशक्ती बनवणे हा आहे. सेमीकंडक्टर इंडिया १.० च्या पहिल्या टप्प्याला भारतामध्ये अभूतपूर्व आणि दमदार यश मिळाले.

गुजरात, उत्तर प्रदेश, पंजाब, आसाम, ओडिशा आणि आंध्र प्रदेशमध्ये आतापर्यंत जवळपास १२ मोठ्या सेमीकंडक्टर प्रकल्पांना अधिकृत मंजुरी दिली आहे. यामध्ये सिलिकॉन फॅब, डिस्प्ले फॅब, कंपाऊंड सेमीकंडक्टर, पॅकेजिंग आणि इतर अत्यंत उच्च तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्पांचा समावेश आहे. या सर्व अनुमोदित प्रकल्पांच्या माध्यमातून भारतामध्ये एकूण १.६४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची विक्रमी गुंतवणूक केली जात आहे. टाटा समूह गुजरातच्या धोरणात्मक क्षेत्रामध्ये देशातील सर्वात पहिली आधुनिक सेमीकंडक्टर फॅब उभारण्याचे ऐतिहासिक काम करत आहे. याशिवाय, अमेरिकेच्या प्रसिद्ध क्येन्स सेमीकंडक्टर कंपनीनेदेखील आसाममध्ये आपले नवीन सेमीकंडक्टर युनिट उभारण्यासाठी पावले उचलली आहेत. तज्ज्ञांच्या मते, येत्या २०२६ च्या उत्तरार्धापर्यंत या सर्व प्रकल्पांमधून प्रत्यक्ष व्यावसायिक उत्पादन सुरू होईल, अशी दाट शक्यता वर्तवली जात आहे.

या संपूर्ण प्रवासात आता सुरू झालेला ?'सेमीकंडक्टर इंडिया २.०?' हा नवीन टप्पा पूर्वीच्या तुलनेत अधिक महत्त्वाकांक्षी आणि व्यापक आहे. सरकारच्या मते, पहिल्या टप्प्याचा उद्देश भारताला केवळ एक फॅब्रिकेशन हब बनवण्याचा होता; परंतु आता दुसऱ्या टप्प्यात सरकारला संपूर्ण सप्लाय चेनमध्ये जागतिक पातळीवर सर्वोच्च स्थान मिळवायचे आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती-तंत्रज्ञान सचिव एस. कृष्णन यांनी स्पष्ट केले आहे की, आता केवळ फॅक्टरी लावण्यापुरते मर्यादित न राहता, चिप डिझाईन, निर्माण, ?डव्हान्स्ड पॅकेजिंग, संशोधन, उपकरणनिर्मिती आणि उच्च दर्जाची प्रतिभा विकसित करून एक मजबूत औद्योगिक परिसंस्थेचे जाळे निर्माण करावे लागणार आहे. नव्या धोरणामुळे भारताला हार्डवेअर निर्मितीचे केंद्र बनवण्याबरोबरच जागतिक स्तरावर डिझाईन सेवा पुरवणारे एक प्रमुख बौद्धिक संपत्ती (आयपी) आधारित ठिकाण बनवण्याचे मोठे ध्येय ठेवले आहे. सरकारचे असे स्पष्ट मत आहे की, भारतीय कंपन्यांनी स्वतःचे डिझाईन केलेले प्रोसेसर, मायक्रोकंट्रोलर आणि विशेष उपयोगासाठी लागणाऱ्या चिप्स विकसित केल्या पाहिजेत, ज्यांचा उपयोग अंतराळ, दूरसंचय, ऑटोमोबाईल आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या अत्यंत संवेदनशील क्षेत्रांमध्ये होऊ शकेल. याद्वारे विदेशी तंत्रज्ञानावर असणारी भारताची जुनी मदार पूर्णपणे संपुष्टात येईल आणि देशातील उदयोन्मुख कंपन्यांना जागतिक बाजारपेठेत आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी सुवर्णसंधी उपलब्ध होईल.

या संपूर्ण धोरणाचा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे आता सेमीकंडक्टर तयार करण्यासाठी लागणाऱ्या मशिनरी, विविध प्रकारची रसायने आणि विशेष वायूदेखील भारतातच उत्पादित केले जाणार आहेत. सेमीकंडक्टरच्या निर्मितीसाठी केवळ फॅब्रिकेशन युनिटस? चालवणे पुरेसे नसते, तर त्यासाठी अतिशुद्ध सिलिकॉन वेफर, स्पेशल गॅसेस, फोटोरेसिस्ट, सिलिकॉन वेफर आणि इतर अनेक रासायनिक सामग्रीची नितांत आवश्यकता असते. आतापर्यंत या सर्व गोष्टींसाठी भारत प्रामुख्याने कोरिया, तायवान, जपान आणि अमेरिका यांसारख्या देशांवर पूर्णपणे अवलंबून होता; परंतु ?'सेमीकंडक्टर इंडिया २.०?' अंतर्गत या कच्च्या मालाच्या उत्पादनाला देशातच प्रोत्साहन दिले जात आहे, ज्यामुळे भारताची जागतिक पुरवठा साखळी अधिक मजबूत होईल आणि परदेशी चलनाची मोठी बचतदेखील साधता येईल.या संपूर्ण मोहिमेच्या यशस्वीतेसाठी सरकारने डिझाईन लिंक्ड इन्सेंटिव्ह (डीएलआय) योजनेअंतर्गत स्टार्टअप्स आणि एमएसएमई प्रकल्पांना भरभक्कम आर्थिक मदत आणि अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक डिझाईन ऑटोमेशन (ईडीए) टूल्स विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत. यामुळे आता देशातील लहान स्टार्टअप्स आणि तरुण अभियंते स्वतःच्या अत्याधुनिक चिप्स आणि सिस्टीम ऑन चिप डिझाईन करू शकत आहेत. याशिवाय, स्टार्टअप्सच्या माध्यमातून देशातील ३१५ हून अधिक विद्यापीठांमध्ये सेमीकंडक्टर डिझाईनचे प्रशिक्षण आणि उद्योग स्तरावरील व्यावसायिक सॉफ्टवेअर मोफत उपलब्ध करून दिले गेले आहेत. मोहाली येथील सेमीकंडक्टर लॅबचे आधुनिकीकरण केले जात असून, तेथे हजारो विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना प्रत्यक्ष चिप्सची चाचणी आणि प्रोटोटाईप तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. भारताने या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती केली असली, तरी आंतरराष्ट्रीय स्तरावरील आव्हाने अद्याप पूर्णपणे संपलेली नाहीत. तज्ज्ञांच्या मते, केवळ आर्थिक सहाय्य देऊन या स्पर्धेत टिकून राहणे शक्य होणार नाही. सेमीकंडक्टर उद्योगाच्या प्रगतीसाठी सतत वीजपुरवठा, मोठ्या प्रमाणावर शुद्ध पाण्याची उपलब्धता, उच्च दर्जाची पायाभूत सुविधा, मजबूत लॉजिस्टिक्स आणि स्थिर धोरणात्मक व करविषयक वातावरण असणे अत्यंत गरजेचे आहे. तायवान, दक्षिण कोरिया आणि अमेरिका यांसारख्या देशांकडे या क्षेत्रात अनेक दशकांचा दांडगा अनुभव आहे. त्यामुळे भारताला जागतिक पातळीवर त्यांच्याशी स्पर्धा करण्यासाठी मोठी गुंतवणूक आणि सातत्य ठेवावे लागणार आहे.

कुटुंबातील आनंदाचा सुगंध- बहर ?

राष्ट्रीय पुत्र- मुलगा आणि मुलगी दिवस.

राष्ट्रीय पुत्र- मुलगा आणि मुलगी दिवस हा दरवर्षी ११ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो, ज्याचा उद्देश पालक आणि त्यांच्या मुलांमधील संबंध साजरे करणे आणि त्यांना ओळखणे आहे. या दिवसाचा मुख्य हेतू पालकांना त्यांच्या मुलांसाठी असलेले प्रेम, अभिमान आणि कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी देणे आहे. मुलांनी आपल्या जीवनात आणलेली आनंद, वाढ आणि शिकवणूक यावर विचार करण्याचा हा एक उत्तम प्रसंग आहे. सदर श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा संकलित लेख वाचकांना समर्पित जी.... संपादक.



कुटुंबे हा दिवस विविध प्रकारे साजरा करतात. काहीजण आपल्या मुलांसोबत वेळ घालवतात, त्यांना आवडणाऱ्या क्रियाकलापांमध्ये सहभागी होतात आणि अविस्मरणीय आठवणी निर्माण करतात. यावेळी पालक आपल्या मुलांसोबत मनमोकळ्या संवादात गुंततात, एकत्र जेवण करतात किंवा साध्या प्रेमळ कृतींनी आपले प्रेम व्यक्त करतात. राष्ट्रीय मुलगा आणि मुलगी दिवस हा कौटुंबिक संबंधांचे महत्त्व अधोरेखित करतो आणि मुलगा आणि मुलगी यांची अनोखी भूमिका ओळखतो. मुलांचे योगदान, व्यक्तिमत्व आणि यशांचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांना महत्व देण्यासाठी हा दिवस एक चांगली संधी आहे. कुटुंबातील प्रेम आणि समर्थनाच्या बंधांना मजबूत आणि आनंदी बनवण्यासाठी हा दिवस एक उत्तम स्मरण आहे. मुलांना नेहमीच आधार देणे आणि त्यांच्या यशस्वी जीवनासाठी प्रोत्साहन देणे हे प्रत्येक पालकाचे कर्तव्य आहे, आणि हा दिवस त्या गोष्टीचे स्मरण करून देतो. आई वडिलांचं आपल्या मुला-बाळांवर जितकं प्रेम असतं. ज्याची सर दुसऱ्या कोणत्याही नात्याला येऊ शकत नाही, खास करुन वडिलांचे आपल्या मुलीवर अधिक प्रेम असते, तर आईची मुलावर अधिक माया असते, यात मुलगी घरची शान असते तर मुलगा आई-वडिलांचा अभिमान असतो. यात आपल्या देशात मुलगा- मुलगी समान असे धोरणं आहे. त्यामुळे मुलींचा ज्याप्रमाणे सन्मान होते त्याप्रमाणे मुलांचाही व्हावा अशी इच्छा असते. अखेर आज मुलांचा सन्मान करण्याचा दिवस आला आहे. दरवर्षी ४ मार्च हा राष्ट्रीय पुत्र दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिनानिमित्त आपल्या कुटुंबातील प्रत्येक मुलाचा सन्मान केला जावा असा उद्देश असतो. राष्ट्रीय पुत्र दिवस का साजरा केला जातो? तर सन २०१८मध्ये पहिल्यांदाच राष्ट्रीय पुत्र दिवस साजरा करण्यात आला. या दिवसाची स्थापना जिल निको यांनी केली. आजच्या जगात पालकांना मुलींप्रमाणे मुलांच्या संगोपनाचे महत्व समजावे हा या मागचा मुख्य उद्देश आहे. मुलगा आपल्या आई- वडिलांना, कुटुंबाला कोणत्याही परिस्थिती सांभळण्यासाठी प्रयत्न करतो, वेळेप्रसंगी कुटुंबाचे रक्षण करतो. घरातील मुलगी लग्न करून जेव्हा सासरी जाते त्यानंतर आई – वडिलांना मुलाचा एक मोठा आधार असतो. वृद्ध वयात मुलगा आपला सांभाळ करेल अशी प्रत्येक आई- वडिलांची अपेक्षा असते. याप्रमाणे अनेक मुलं आई-वडिलांना सांभाळतात. घरावर कठीण प्रसंग आला तर न खचता कुटुंबातील मुलगा सर्व परिस्थिती सावरून घेण्यासाठी झटतो. अशा प्रत्येक मुलाचा सन्मान या दिनानिमित्त झाला पाहिजे अशी अपेक्षा असते. अगदी बालपणापासूनचं प्रत्येक आई-वडिलांनी मुलींप्रमाणे मुलांचे चांगले संगोपन केले पाहिजे. मुलींबाबत समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी अनेक समारंभ, कार्यक्रम घेतले जातात, त्याप्रमाणे मुलांसाठीही असे अनेक कार्यक्रम घेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मुलगी असो वा मुलगा दोन्ही कुटुंबासाठी तितकेच आपलेसे असतात, हे सांगण्याची गरज निर्माण झाली आहे. म्हणून भारतात दरवर्षी राष्ट्रीय पुत्र दिवस साजरा केला जातो. यादिनानिमित्त तुम्ही तुमच्या भावाला, मित्रांना काही खास भेट, शुभेच्छा देऊन हा दिवस साजरा करू शकता.

मुलगा (पुत्र) आणि मुलगी (पुत्री) हे मानवी समाजाचे दोन महत्त्वाचे घटक आहेत. निसर्गाने दोघांना समान अधिकार आणि महत्त्व दिले आहे. वैज्ञानिकदृष्ट्या, मूल मुलगा किंवा मुलगी होणे हे पुरुषाच्या गुणसूत्रांवर (क्रोमोझोम्सवर) अवलंबून असते, आणि यामध्ये स्त्रीला जबाबदार धरले जाणे हा एक सामाजिक गैरसमज आहे.कोणाला मुलगा हवा असतो तर कोणाला मुलगी! पण दोघांना वाढण्याच्या, त्यांच्या संगोपनाच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत हे पालकांना समजायला हवे. अनेक कुटुंब खूप भाग्यशाली असतात कारण त्या कुटुंबामध्ये एक मुलगा आणि एक मुलगी असते. पण या सुदैवासोबत त्यांच्या खांद्यावर त्या दोन्ही मुलांना नीट वाढवण्याची सुद्धा जबाबदारी येते. अशावेळी पालकांना या दोन्ही मुलांना मुलगा आणि मुलगी म्हणून कसं वाढवावं हे माहित असणे गरजेचे आहे. मुलगा आणि मुलगी हे विभिन्न लिंगी असतात यामुळे त्यांच्या शरीराची रचना सुद्धा वेगवेगळी असते. या बाबतीत मुलींची खूप काळजी घ्यावी लागते आणि त्यांना विविध गोष्टी देखील शिकवाव्या लागतात. त्यांचे खाजगी अंग हे खूप संवेदनशील असतात. या अंगाची खास काळजी घ्यावी लागते. मुलींना या गोष्टी लवकर शिकवाव्या लागतात यामुळे त्या अधिक लवकर मॅच्युर होतात. हीच गोष्ट मुलांना देखील लागू होते. त्यांच्या खाजगी अंगाची सुद्धा काळजी घ्यावी लागते. पण आपल्या समाजात मुलांपेक्षा मुलींची काळजी अधिक घेतली जाते, हे विशेष. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! राष्ट्रीय पुत्र दिनाच्या समस्त मानव परिवारांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

- संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.
राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त मधुभाष- ९६९९८३६७१७.

ताण पळवून लावेल एआय नर्व्ह स्टिम्युलेटर

अंगावर आदळणारी ऑफिसची टार्गेटस?, घड्याळाच्या काट्यावर पळणारी जीवघेणी स्पर्धा, अपुरी झोप आणि रात्री डोक्यात सतत फेर धरणारे विचारांचे चक्र. आजच्या डिजिटल युगातील ही प्रत्येक माणसाची एक अपरिहार्य; पण अस्वस्थ कहाणी बनली आहे. मनात साचणारा हा अदृश्य ताणतणाव पळवून लावण्यासाठी कोणी ध्यानाचा मार्ग निवडते, तर कोणी मोबाईलमधील ?प्सचा आधार घेते; पण प्रत्येकवेळी मनाला शांती मिळतेच, असे नाही. शरीराची हीच तडफड ओळखून, आपल्या नर्व्हस सिस?टीमला अवघ्या काही मिनिटांत नैसर्गिकरीत्या शांत करण्यासाठी 'गॅजेट वर्ल्ड'मध्ये न्यूरोसायन्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा एक अद्?भुत संगम अवतरला आहे. आपण एर०?ही गळ्यात गाणी ऐकण्यासाठी जसा ब्लूटूथ हेडफोन सहज अडकवतो, अगदी तशीच रचना असणारे हे स्मार्ट नर्व्ह स्टिम्युलेटर गळ्यात घालताच, ते मज्जासंस्थेतील अतिशय संवेदनशील मानल्या जाणाऱ्या व्हॅगस नर्व्हला सूक्ष्म लहरींद्वारे स्पर्श करते आणि अवघ्या काही क्षणात डोक्यातील विचारांचे वादळ शांत करून मनाला कमालीचे रिलॅक्स बनवते.

हे गॅजेट कानाच्या मज्जातंतूंना अतिशय सूक्ष्म आणि सुरक्षित इलेक्ट्रॉनिक लहरी देऊन मज्जासंस्थेला शांत करते. यात रिलॅक्स, स्लीप, रीलिफ, मेडिटेशन, फोकस आणि डायजेस्ट असे ६ विशेष क्लिनिकली प्रूव्हन मोडस? दिले



आहेत. वापरकर्त्याच्या शारीरिक स्थितीनुसार योग्य त्या लहरी देऊन रात्रीची झोप सुधारणे, पचनक्रिया सुरळीत करणे आणि कामात एकाग्रता वाढवणे ही कामे हे गॅजेट अत्यंत प्रभावीपणे करते.

हे हाय टेक वेअरेबल गॅजेट वापरणे अत्यंत सोपे आणि दैनंदिन दिनचर्येत सहज बसणारे आहे. हे गॅजेट वापरण्याची पद्धत साधारणपणे आपण नेकबँड स्टाईल ब्लूटूथ हेडफोन वापरतो अगदी तशीच आहे. याच्या मुख्य बॉडीची डिझाईन गळ्याभोवती अडकवण्यासाठी नेकबँडसारखी दिलेली आहे व त्यातून निघणारे लहान सेन्सर क्लिप्स कानावर/कानात अगदी हेडफोनसारखेच फिट बसतात. त्यामुळे फोनचे हेडफोन्स घालून गाणी ऐकावीत, अगदी तितक्याच सहजपणे तुम्ही हे उपकरण कानात लावून ऑफिसमध्ये काम करताना किंवा आराम करताना व्हॅगस नर्व्ह थेरपी घेऊ शकता.

दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे, यातील कंटिन्युअस ट्रॅकिंगची अचूकता. याद्वारे वापरकर्त्याच्या हृदयाची गती, झोपेचा आलेख आणि हार्ट रेट व्हॅरिएबिलिटी (एचआरव्ही) यासारख्या जैविक घटकांवर २४ तास बारीक लक्ष ठेवले जाते. या उपकरणाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, यात दिलेला मल्टी-मॉडल एआय कोच. हा एआय कोच व्हॅगस नर्व्हच्या रिसर्च डेटाबेसवर आधारलेला आहे. याच्या ?पमध्ये दिलेल्या एआयशी थेट बोलून तुमच्या सध्याच्या शारीरिक आणि मानसिक स्थितीची माहिती देऊ शकता. वापरकर्त्याचा ताण नक्की कशामुळे वाढला आहे किंवा झोप का अपुरी झाली आहे. याचे क्रॉस ?नालिसिस करून हा एआय कोच तुम्हाला कोणत्या मोडमध्ये किती वेळ थेरपी घ्यायची, याचे अचूक आणि वैयक्तिक मार्गदर्शन करतो.

हे गॅजेट दैनंदिन वापरासाठी अत्यंत सोपे आणि कम्फर्टेबल बनवले आहे. ऑफिसच्या कामामध्ये छोटा ब्रेक घेताना किंवा रात्री झोपण्यापूर्वी फक्त काही मिनिटांचे सेशन्स घेऊन तुम्हाला तत्काळ शांतता आणि ताजेतवाने वाटू लागते. या हाय टेक एआय गॅजेट सिस्टीमची किंमत भारतीय चलनात अंदाजे २६ ते ३० हजार रुपयांच्या घरात जाते.

आदिवासी विद्यार्थ्यांची जंगलाच्या कुशीतून आकाशाकडे झेप

राष्ट्रपती भवन, संसद ते आयआयटी-विज्ञान केंद्र; शैक्षणिक अभ्यास दौऱ्यांतून दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसमोर खुली होताहेत नव्या संधींची क्षितिजे

ज्या आदिवासी मुला-मुलींसाठी कधीकाळी जिल्ह्याचे ठिकाण गाठणेही मोठी गोष्ट होती, त्याच दुर्गम आदिवासी भागातील नवी पिढी आज विमानाने दिल्ली-मुंबई, हैदराबाद आणि बंगलोर गाठत आहे. देशाच्या राष्ट्रपतींशी संवाद साधत आहे, संसद भवन पाहत आहे, आयआयटी, इस्रो आणि विज्ञान केंद्रांना भेट देत आहे, मंत्रालय-विधानभवनाची कार्यपद्धती समजून घेत आहे. आपल्या गावाच्या, जंगलाच्या आणि परिचित परिसराच्या पलीकडे संधींचे किती विशाल विश्व आहे, हे ती प्रत्यक्ष अनुभवत आहेष्ठ.

गडचिरोलीच्या दुर्गम आदिवासी भागातील एका विद्यार्थ्याने राष्ट्रपती भवनात भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्यासमोर आत्मविश्वासाने उभे राहून, 'मला शिक्षक व्हायचे आहे,' असे सांगणे हा या परिवर्तनाचा बोलका क्षण आहे. त्यावर राष्ट्रपतींनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि शिक्षण, मेहनत व चिकाटीच्या बळावर ती पूर्ण करण्याचा प्रेरणादायी संदेश दिला.

ही केवळ एका आदिवासी विद्यार्थ्याची गोष्ट नाही. ही आदिवासीबहुल गडचिरोलीच्या नव्या पिढीच्या बदलत्या आकांक्षांची गोष्ट आहे. आपल्या समृद्ध संस्कृतीची मुळे जपत शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिक संधींच्या दिशेने आत्मविश्वासाने पुढे जाणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या नव्या प्रवासाची ही सुरुवात आहे.

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी संधींचे नवे आकाश

महाराष्ट्राच्या पूर्व टोकावर वसलेला गडचिरोली हा आदिवासीबहुल, वनव्याप्त आणि प्रामुख्याने ग्रामीण जिल्हा. घनदाट जंगले, नद्या-नाले, विपुल वनसंपदा आणि समृद्ध आदिवासी संस्कृती ही या जिल्ह्याची ओळख आहे. मात्र, भौगोलिक दुर्गमतेमुळे अनेक गावांतील नागरिकांचा मोठ्या शहरांशी प्रत्यक्ष संपर्क मर्यादित राहिला आहे. आजही दुर्गम भागातील अनेक नागरिकांनी जिल्हा मुख्यालय पाहिलेले नाही; नागपूर, मुंबई किंवा दिल्लीसारख्या महानगरांचा प्रत्यक्ष अनुभव तर अनेकांसाठी दूरची बाब आहे.

या भौगोलिक अंतरामुळे आदिवासी मुलांच्या गुणवत्तेला किंवा क्षमतेला मर्यादा नसल्या, तरी त्यांच्या अनुभवविश्वाला मर्यादा येऊ शकतात. हीच दरी कमी करण्यासाठी शासन आणि जिल्हा प्रशासनाकडून शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवाच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे.

मुख्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली गडचिरोली जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाबरोबरच दुर्गम व आदिवासी भागातील नव्या पिढीला गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक ज्ञान आणि व्यापक अनुभवाच्या संधी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जात आहे. या व्यापक प्रयत्नांचाच एक भाग म्हणून विविध विभागांच्या माध्यमातून आदिवासी आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना विमानाने देशातील महानगरांमध्ये शैक्षणिक अभ्यास दौऱ्यांची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

उद्देश केवळ मोठी शहरे दाखविण्याचा नाही; तर देशातील आधुनिक पायाभूत सुविधा, विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगती, उच्च शिक्षणाच्या संधी, लोकशाही व प्रशासकीय व्यवस्था आणि ऐतिहासिक-सांस्कृतिक वारसा प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी देऊन येथील विद्यार्थ्यांच्या आकांक्षांना नवे क्षितिज देण्याचा आहे.

तीन विभाग गडचिरोलीत
विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एकच ध्येय

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने मागील तीन वर्षात गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय निवासी शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या एकूण ३६० विद्यार्थ्यांना विमानाने हैदराबाद, बंगळुरू व यावर्षी दिल्लीच्या शैक्षणिक अभ्यास दौऱ्याची संधी दिली.

यातील अनेक विद्यार्थ्यांसाठी विमानप्रवासाचा हा पहिलाच अनुभव होता. नागपूर विमानतळावरून दिल्लीकडे विमानाने झेपावताना त्यांच्या चेहऱ्यावरील कुतूहल आणि आनंद त्यांच्या अनुभवविश्वात घडत असलेल्या बदलाची साक्ष देत होता.

दिल्लीमध्ये राष्ट्रपती भवन, संसद भवन आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या विविध स्थळांना भेट देऊन विद्यार्थ्यांनी देशाची लोकशाही व्यवस्था, इतिहास, संस्कृती आणि विकासाचे विविध आयाम समजून घेतले.

राष्ट्रपतींसमोर आदिवासी विद्यार्थ्यांनी मांडली भविष्याची स्वप्ने

आदिवासी विकास विभागाने जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेतून गडचिरोली, अहेरी आणि भामरागड येथील शासकीय आश्रमशाळांमधील ९६ आदिवासी विद्यार्थ्यांसाठी दिल्ली शैक्षणिक अभ्यास दौरा आयोजित केला. या दौऱ्याचा सर्वाधिक प्रेरणादायी क्षण ठरला तो राष्ट्रपती भवनातील भेटीचा.

जागतिक आदिवासी दिन विशेष...



भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी गडचिरोलीच्या आदिवासी विद्यार्थ्यांचे आत्मीयतेने स्वागत केले. त्यांनी विद्यार्थ्यांची नावे, गावे, शिक्षण आणि भविष्यातील ध्येय जाणून घेतले. पोटेगाव येथील एका विद्यार्थ्याने शिक्षक होण्याची इच्छा व्यक्त केली. त्याच्या स्वप्नाचे कौतुक करत राष्ट्रपतींनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा संदेश दिला.देशाच्या एका दुर्गम आदिवासी गावातून आलेला विद्यार्थी राष्ट्रपती भवनात देशाच्या प्रथम नागरिकांसमोर उभा राहून आत्मविश्वासाने आपल्या भविष्याचे स्वप्न सांगतो—हा बदलत्या गडचिरोलीचा आणि नव्या आकांक्षांनी भरलेल्या आदिवासी पिढीचा अत्यंत आश्वासक क्षण आहे.

या विद्यार्थ्यांनी संसद भवन, पंतप्रधान संग्रहालय, राष्ट्रीय विज्ञान केंद्र, आयआयटी दिल्ली, जंतरमंतर, राजघाट, लाल किल्ला, कुतुबमिनार आणि राष्ट्रीय प्राणीसंग्रहालयालाही भेट दिली. लोकशाहीपासून विज्ञानापर्यंत आणि इतिहासापासून उच्च शिक्षणापर्यंत देशाच्या विविध क्षेत्रांची ओळख त्यांना प्रत्यक्ष अनुभवातून झाली.

'मिशन जिकतूर' : गुणवत्तेतून संधी, संधीतून आकांक्षा

जिल्हा परिषद गडचिरोलीने ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी 'मिशन जिकतूर' हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे. या अंतर्गत शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीतील जिल्हा परिषद शाळांच्या विद्यार्थ्यांना विमानाने मुंबईच्या शैक्षणिक अभ्यास दौऱ्यावर नेण्यात आले.

दौऱ्यात विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचे मुख्य सचिव तथा गडचिरोलीचे पालक सचिव राजेश अग्रवाल यांच्याशी संवाद साधून शिक्षक, डॉक्टर, कलेक्टर आणि पोलीस अधिकारी होण्याची स्वप्ने मांडली. तसेच मंत्रालय, विधानभवन, गेटवे ऑफ इंडिया, नेहरू विज्ञान केंद्र, तारांगणासह विविध ऐतिहासिक व शैक्षणिक स्थळांना भेट दिली.

'मिशन जिकतूर'अंतर्गत शिष्यवृत्ती व नवोदय प्रवेश परीक्षेची विशेष तयारी, तज्ज्ञ मार्गदर्शन, ओएमआर सराव आणि शिक्षकांचे उद्बोधन याद्वारे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला संधी आणि त्यांच्या आकांक्षांना नवी दिशा दिली जात आहे.

ही केवळ विमानाने केलेली शैक्षणिक सहल नाही.या उपक्रमांचे मूल्यमापन केवळ किती विद्यार्थ्यांनी विमानप्रवास केला किंवा किती स्थळांना भेट दिली एवढ्यावर करता येणार नाही. त्यांचा खरा परिणाम आदिवासी आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या विचारविश्वात व आकांक्षांमध्ये शोधावा लागेल.

एखाद्या मुलाला 'वैज्ञानिक हो' असे सांगणे आणि त्याला प्रत्यक्ष विज्ञान केंद्र किंवा संशोधन संस्था दाखविणे यात फरक आहे. 'मोठा अधिकारी हो' असे सांगण्यापेक्षा संसद भवन, राष्ट्रपती भवन, मंत्रालय किंवा विधानभवनाची व्यवस्था प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी देणे अधिक परिणामकारक आहे. आयआयटीचे नाव पुस्तकात वाचण्यापेक्षा त्या संस्थेच्या परिसरात उभे राहिल्यावर 'मीसुद्धा एक दिवस येथे शिकू शकतो' हा विचार मनात निर्माण होणे अधिक महत्त्वाचे आहे.

विकास म्हणजे केवळ रस्ते, पूल, वीज आणि इमारती नव्हेत. विकास म्हणजे संधींची दारे खुली होणे, स्वतःच्या क्षमतेची जाणीव निर्माण होणे आणि 'मीसुद्धा हे करू शकतो' हा आत्मविश्वास आदिवासी समाजाच्या नव्या पिढीच्या मनात रुजणे.

आदिवासी संस्कृतीची मुळे जपत आधुनिकतेच्या दिशेने

गडचिरोलीच्या आदिवासी समाजाची स्वतंत्र जीवनपद्धती, भाषा, लोककला, परंपरा, सामूहिक जीवनमूल्ये आणि निसर्गाशी असलेले अतूट नाते ही जिल्ह्याची अमूल्य संपदा आहे. आधुनिक विकास म्हणजे हा वारसा मागे सोडणे नव्हे. आपल्या संस्कृतीची मुळे अधिक घट्ट पकडून आधुनिक शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान आणि नव्या संधींचे आकाश पुढील आदिवासी पिढीसाठी खुले करणे, हा विकासाचा अधिक व्यापक अर्थ आहे.

जागतिक आदिवासी दिन हा आदिवासी समाजाच्या अस्मितेचा, संस्कृतीचा आणि समृद्ध परंपरांचा गौरव करण्याचा दिवस आहे; त्याचवेळी आदिवासी समाजाच्या नव्या पिढीच्या शिक्षणाचा, आकांक्षांचा आणि भविष्याचा विचार करण्याचाही हा दिवस आहे.

आज गडचिरोलीतील आदिवासी विद्यार्थी आपल्या गावाच्या सीमा ओलांडून देशाच्या सर्वोच्च संस्थांपर्यंत पोहोचत आहेत. राष्ट्रपतींशी संवाद साधत आहेत. संसद भवनात देशाची लोकशाही समजून घेत आहेत. आयआयटी आणि विज्ञान केंद्रांमध्ये उद्याच्या संधी शोधत आहेत.

जनप्रभात हे दैनिक जनप्रभात हे दैनिक पत्र मालक,प्रकाशक,मुद्रक :संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टा, ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242

बीडी कामगारांच्या थकित किमान वेतनाची अंमलबजावणी सुरू

कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या प्रयत्नांना यश

मुंबई : किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत पहिल्या अनुसूचीतील तंबाखू (बिडी निर्माणसह) वस्तुनिर्मागातील अनुसूचित उद्योगातील बिडी कामगारांच्या प्रलंबित किमान वेतन दराचा प्रश्न अखेर पूर्णपणे मार्गी लागला आहे. कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि पुढाकारामुळे बीडी कामगारांच्या बकित किमान वेतनाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. त्याअनुषंगाने शासनाने बिडी कामगारांच्या सुधारित किमान वेतनाची अंमलबजावणी करण्याचे व फरकाची तसेच थकबाकीची वसुली प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित यंत्रणेला दिले आहेत.



बिडी कामगारांच्या प्रलंबित वेतनाबाबत विविध कामगार संघटना आणि मालक संघटनांकडून आलेल्या निवेदनांची गांभीर्याने दखल घेत कामगार मंत्री ?ड. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली वेळोवेळी महत्वपूर्ण बैठका पार पडल्या. त्यांनी दोन्ही संघटनांचे म्हणणे सविस्तर ऐकून घेतले व २ जून २०२६ रोजी झालेल्या अंतिम बैठकीत दोन्ही बाजूंच्या प्रतिनिधींना सविस्तर निवेदने सादर करण्याचे निर्देश दिले होते. विविध संघटनांची निवेदने कामगार आयुक्तांमार्फत शासनासप्राप्त झाली.

बिडी कामगारांच्या प्रलंबित किमान वेतन दराच्या पुनर्निर्धारणाबाबत विधि व न्याय विभागाचे अभिप्राय मागवण्यात आले. विधि व न्याय विभागाने नोंदवलेल्या अभिप्रायानुसार, १० नोव्हेंबर २०१४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे घोषित केलेले किमान वेतनाचे दर सद्यस्थितीत लागू असून त्याच्या अंमलबजावणीवर कोणतीही कायदेशीर स्थगिती नाही. त्यामुळे वेतनाची अंमलबजावणी करण्यात कोणताही कायदेशीर अडथळा उरलेला नसून सक्षम प्राधिकरणांनी या दरांची कठोर अंमलबजावणी करावी व देय थकबाकी, फरकासाठी वसुलीची कार्यवाही सुरू करावी, असा स्पष्ट अभिप्राय देण्यात आला.

विधि व न्याय विभागाच्या या अभिप्रायाला अनुसरुन शासनाने ३ ऑगस्ट २०२६ रोजीच्या पत्रान्वये कामगार आयुक्तांना १ जानेवारी २०२६ ते ३० जून २०२६ या कालावधीतील महागाई भत्त्यासह सुधारित वेतनाची कठोर अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. नवीन निश्चितीनुसार बिडी कामगारांना सर्व महानगर पालिका हद्द असलेल्या परिमंडळ-१ मध्ये मूळ वेतन २१० रुपये आणि महागाई भत्ता १६९ रुपये मिळून एकूण ३७९ रुपये प्रतिदिन वेतन देय राहील. तर सर्व महानगरपालिका हद्द वगळून उर्वरित इतर कार्यक्षेत्र असलेल्या परिमंडळ-२ मध्ये मूळ वेतन १९२ रुपये आणि महागाई भत्ता १६९ रुपये मिळून एकूण ३६१ रुपये प्रतिदिन वेतन १००० बिड्या वळणाऱ्या कर्मचाऱ्यांना मिळणार आहे. शासनाने थकबाकी व फरकाची वसुली प्रक्रिया तात्काळ सुरू करण्याचे निर्देश दिल्यामुळे राज्यातील हजारो बिडी कामगारांना मोठा दिलासा मिळाला असून, कामगार वर्गातून कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विचारवेध पुरस्कारांचे वितरण !



सातारा : बहुजनांनी एकत्र येऊन सनापालट केली तरच परिवर्तन होईल.महापुरुषांचा स्वाभिमान जपण्यासाठी प्रथमतः शिक्षण घेतले पाहिजे.अंधश्रद्धेला मूठमाती देऊन प्रगती साधता येईल. असे प्रतिपादन डेमोक्रॅटिक पक्षाचे संस्थापक-अध्यक्ष प्रा.सुकुमार कांबळे यांनी केले.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे कृती समितीतर्फे परिवर्तनवादी विचारांचा जागर करण्यासाठी पोवईनाका येथील हटिल हेम एक्झिक्युटिव्ह येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विचारवेध पुरस्कार वितरण मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले.तेव्हा डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुकुमार कांबळे अध्यक्षस्थानावरुन मार्गदर्शन करीत होते.प्रथमतः डॉ.बाबासाहेब आंबेडकर, बिरसा मुंडा,छ. शिवाराय व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले.

प्रा.सुकुमार कांबळे म्हणाले, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मनिरपेक्षता दिली आहे. त्यानुसार वाटचाल केली पाहिजे. बुद्धांनी तर सांगितले होते की, मुला-बाळांना शिक्षण देऊन नीतिमत्तेच्या जोरावर यश खेचून आणले पाहिजे. त्यालाच स्वर्ग म्हणता येईल. जात ही 'ज'चे घरटे आहे.तेव्हा त्यातून बाहेर पडायचे असेल तर अनिष्टरुढी व व्यसनाधितांना तिलांजली दिली पाहिजे. महापुरुष वाचले तर आपसुकच परिवर्तन होईल.राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापुरात २१ वसतिगृहांची निर्मिती करून बहुजनांना शिक्षण दिले. भारतरत्न डॉ.बाबासाहेबांना दिला. इतरांनाही वेगवेगळ्या क्षेत्रातील कार्यबद्दल दिला गेला. अण्णाभाऊंनीसे साहित्य जागतिक स्तरांवर पोहचवाने आम्ही वर्षानुवर्षे भारतरत्न मिळावा म्हणून मागणी करीत आहोत. याउलट,५० साहित्यिकांची यादी कोणीतरी जाहीर केली असून त्यात अण्णाभाऊंचे नाव नाही.अहो, त्यांनी तर दिन- दलीत,कष्टकरी, वंचित- शोषित आदींचे लेखन केले.त्यांनी घोड्याला घोडाच म्हटले म्हणून की काय ?अण्णाभाऊंनी शाहीरीच्या माध्यमातून बाबासाहेबांचे विचार सांगितले.फकिरा कादंबरी त्यांनी बाबासाहेबांनाच अर्पण केली. मूठभर सत्ताधारी बहुजनांचा डोळ्यात धूळ फेकून जो कारभार करीत आहेत,त्यांना सुरुंग लावण्यासाठीच आपण एक जाणे पाहिजे.'

बंधुत्व पुरस्कार विजेते डॉ.श्रीमंत कोकाटे म्हणाले, 'अण्णाभाऊ रशियात गेले होते.तरी पाटीमागे अस्णाऱ्या बांधवांना विसरले नाहीत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णाभाऊ अग्रभागी होते.त्यांच्यामुळेच मुंबई आपणास मिळाली. अठरापगड जाती या मराठा म्हणून कार्यरत आहेत. कोणत्याही भाषेचा कोणीही द्वेष करू नये.'

उमेश चव्हाण म्हणाले, 'बहुजन संघटना एकत्रीत येण्याचा फार्स करतात. मात्र,निवडणुका आल्या की भरकटतात.अजुनही वेळ गेलेली नाही.३ वर्षात एकत्रितपणे येऊन काम केले पाहिजे.' यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विचारवेध पुरस्कार डॉ. कोकाटे,प्रा. कांबळे यांच्यासह बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य दिलीप तुपे व पालिकेचे समापती नगरसेवक अशोक शेडगे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी अनेकांनी मनोगत व्यक्त केली.

सदरच्या कार्यक्रमास संबोधी प्रतिष्ठानचे अध्यक्ष इंजि.रमेश इंजे, राजर्षी शाहू शिक्षण संस्थेचे सचिवेसर्व नरेंद्र पवार, रासपचे जिल्हाध्यक्ष डॉ. रमाकांत साठे, रामदास वाघमारे, सुरेश वाघमारे, किरण पवार-कांबळे,श्रीमंत भंडारे, मारुती भोसले,अमर गायकवाड, रघुनाथ बाबर, तरवेज बागवान,रवींद्र बाबर, संदीप जाधव,अनिल खरात, प्रकाशकशीळकर, प्रकाश सावंत, संजय नितनवरे, डॉ. अरुण गाडे,बळीराम जाधव, अमोलबनसोडे, मधुकर आठवले, अनिरुद्ध वीर आदी मान्यवर उपस्थित होते. समितीचे संस्थापक-अध्यक्ष उमेश चव्हाण यांनी प्रास्ताविक केले.रावण तया वृषीकेश गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले.संदीप जाधव यांनी आभारप्रदर्शन केले.याकामी, किशोर कांबळे, महेश वाघदरे, संदीप माने, आशिष जाधव, सचिन मोरे, सौ.मनिषा चव्हाण, प्रकाश फरांदे, रीना भोसले, रुपिता पवार, अक्षदा काळे, वैभव गवळी, सुशांत गुंजाळ, धनाजी भोसले, माधुरी भोसले, चमेली पवार, आशिकी गुंजाळ, सविता कणसे, विमल शिंदे,भोसले आदींनी अथक असे परिश्रम घेतले.

राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षणाची संधी

मुंबई : देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येते. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून या शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत.



महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाच्या सुधारित नियमानुसार, राज्यातील अनुसूचित जातीच्या (नवबौद्धांसह) दरवर्षी १०० विद्यार्थ्यांना या योजनेतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येते. भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या संकेतस्थळावर मान्यता प्राप्त एआयआयएमएस, आयआयएम, आयआयटी, आयआयआयटीस, एन?आयटी, आयआयएससी, आयआयसरएार, इन्स्टीटयूट ऑफ नॅशनल इंपार्टन्स तसेच अन्य नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये पदवी, पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

या योजनेत संबंधित शैक्षणिक संस्थांच्या शासन निर्णयातील परिशिष्ट 'ब'मध्ये नमूद शाखा व उपशाखांचाही समावेश करण्यात आला आहे. भविष्यात या संस्थांच्या नव्याने सुरू होणाऱ्या शाखा व उपशाखांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. आयआयटी मधील प्रिपेरेटरी कोर्स वगळता पूर्णवेळ अभ्यासक्रमांसाठी ही शिष्यवृत्ती लागू राहणार आहे. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी पात्र अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत अर्ज सादर करावेत. अर्जाचा विहित नमुना महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळासह सामाजिक न्याय विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

विहित नमुन्यातील अर्ज संकेतस्थळावरून डाउनलोड करून आवश्यक कागदपत्रांसह पूर्ण भरलेला अर्ज मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे विहित मुदतीत समक्ष अथवा टपालद्वारे सादर करावा, असे आवाहन सहायक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई उपनगर यांनी केले आहे.

आदिवासी पाड्यावर आदिवासी दिन मोठ्या उत्साहात संपन्न !

सातारा / अनिल वीर

रानभाज्यांचे प्रदर्शन, पारंपरिक वेशभूषेतील मिरवणुकीने लक्ष वेधून घेत आंतरराष्ट्रीय विश्व आदिवासी दिन कुंभरोशी, ता. महाबळेश्वर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती, परंपरा, लोकजीवन, पारंपरिक आहारपद्धती आणि निसर्गाशी असलेले अनूट नाते यांचे दर्शन या कार्यक्रमातून घडले. आदिवासी समाजाच्या हक्कांरोबरच त्यांच्या पारंपरिक संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि पुढील पिढीपर्यंत त्याचा वारसा पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला आदिवासी बांधव आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध पारंपरिक उपक्रमांमधून आदिवासी समाजाच्या जीवनशैलीची ओळख उपस्थितांना करून देण्यात आली.यावेळी संजय कदम आणि सुनील केळगणे यांनी आदिवासी समाजासाठी शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती दिली. आदिवासी बांधवांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजना, त्यातून मिळणारे लाभ तसेच योजनांचा लाभघेण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेत लाभार्थ्यांनी घ्याव आणि उपलब्ध संधींचा उपयोग करून सामाजिक व आर्थिक विकास साधावा. असे आवाहन यावेळी करण्यात आले.

माजी सरपंच सखाराम वेंबे म्हणाले,'आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकोपा ही समाजाची मोठी ताकद आहे.हा वारसा जपण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. त्याचबरोबर नव्या पिढीने शिक्षणाला महत्त्व देऊन विकासाच्या प्रवाहात पुढे आले पाहिजे.' रानभाज्यांचे प्रदर्शन ठरले आकर्षण : कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते रानभाज्यांचे प्रदर्शन.कुंभरोशी आणि परिसरातील जंगल व डोंगरभागात पारंपरिक पद्धतीने उपलब्ध होणाऱ्या विविध रानभाज्या प्रदर्शनात मांडण्यात आल्या. या रानभाज्यांची माहिती, त्यांचा पारंपरिक आहारातील वापर आणि आदिवासी समाजाच्या जीवनातील त्यांचे महत्त्व याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली.निसर्गाच्या सान्निध्यात राहणाऱ्या आदिवासी समाजाने पिढ्यानपिढ्या जपलेल्या पारंपरिक ज्ञानाची झलक या प्रदर्शनातून पाहायला मिळाली. बदलत्या काळात पारंपरिक रानभाज्या आणि त्यांच्याशी संबंधित ज्ञान जतन करण्याची गरजही या उपक्रमातून अधोरेखित झाली.पारंपरिक वेशभूषेत मिरवणुकीत समाजाने सहभाग नोंदवला होता. आदिवासी बांधवांनी पारंपरिक पोषाख परिधान करून मिरवणुकीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. मिरवणुकीच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या विविध रूढी, चालीरीती आणि परंपरा जिवंत करण्यात आल्या.यावेळी आदिवासी समाजातील विविध पारंपरिक पद्धती आणि लोकजीवनाशी संबंधित माहिती उपस्थितांना देण्यात आली. आपल्या पूर्वजांनी जपलेल्या परंपरा आणि संस्कृतीचे महत्त्व नव्या पिढीला समजावे आणि हा सांस्कृतिक वारसा पुढेही जतन व्हावा. हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा आणि निसर्गाशी असलेले नाते यांचा जागर करत सामाजिक एकोपा आणि विकासाचा संदेश देत कार्यक्रमाला आदिवासी बांधवांसह ग्रामस्थांची उपस्थिती लाभली.

ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक राजेंद्र केरकर यांना अण्णाभाऊ साठे जीवन गौरव सन्मान

राजेंद्र केरकर यांना अण्णाभाऊ साठे पुरस्कार

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव समिती, कराड महाराष्ट्र यांच्यातर्फे २०१४ पासून देण्यात येणाऱ्या जीवन गौरव पुरस्कारासाठी यंदा गोव्यातील पर्यावरण कार्यकर्ते राजेंद्र पां .केरकर यांची निवड केलेली आहे .



प्रतिवर्षी समितीतर्फे भारताच्या उन्नतीसाठी भरीव योगदान देणाऱ्या मान्यवरास जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते .आजवर साथी भाई वैद्य, कॉम्रेड गोविंद पानसरे, डॉ. आ .ह. साळुंखे, सिंधुताई सपकाळ, सत्यपाल महाराज, अंकल सोनवणे, प्रा . बाबूराव गुरव, डॉ .प्रकाश आमटे आदी मान्यवरांना सन्मानित करण्यात आलेले आहे .

यंदा समितीने या पुरस्कारासाठी गोव्यात, तसेच महाराष्ट्र, कर्नाटक सीमाभागातील पर्यावरणीय समस्यांविषयी, तसेच तेथील जैविक संपदेच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या श्री . केरकर यांची निवड करण्यात आली आहे . सदर पुरस्कार ३० ऑगस्ट रोजी वेणूताई चव्हाण सभागृह, कराड येथे मान्यवरांच्या उपस्थितीत श्री . केरकर यांना देण्यात येणार आहे . त्यांच्यातर्फे म्हादई बचाव अभियान, कृष्णा बचाव अभियान राबविण्यात येत असून, पर्यावरण, इतिहास, संस्कृती त्याचप्रमाणे आदिवासी तसेच पशुपालक समाजाच्या प्रश्नांसंदर्भात ते सातत्याने लेखन करत असतात .कराड तालुका शाळा महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक केरकर यांनी लोक संस्कृती पर्यावरण नदी बचाव यासाठी जनजागृती मोहीम युवकांना प्रबोधन करण्यात आले आहे निवड झाल्यानंतर कराड तालुक्यातील त्यांच्यावर अभिनंदन याचा वर्षाव होत आहे

डॉ. मुमताज अहमद खान उर्दू हायस्कूलमध्ये क्रांती दिन उत्साहात साजरा

उर्दु शाळेचा सदैव अभिनव उपक्रम राबवण्यात सहभाग.



महंमद मुलाणी / आंबेगाव

मंचर : डॉ. मुमताज अहमद खान उर्दू हायस्कूल, मंचर येथे ९ ऑगस्ट क्रांती दिन उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध स्वातंत्र्यसैनिकांच्या वेशभूषा परिधान करून त्यांच्या शौर्य, त्याग व बलिदानाची ओळख करून दिली.

विद्यार्थ्यांनी साकारलेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या भूमिका आणि प्रभावी सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि स्वातंत्र्यसैनिकांप्रती आदराची भावना निर्माण झाली.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ मोमीन टीएम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसिया मिस यांनी , तर आभार प्रदर्शन गुलनाज मिस यांनी केले. या कार्यक्रमास सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंद यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

खेड (नांदगिरी) येथे प्रथम स्मृतिदिनानिमित्त आदरांजली !



सातारा : पंचशील भिम मंडळ पंचशील नगर, खेड (नांदगिरी), ता.कोरेगाव येथील विहारात कालकथीत विकास शिवराम भंडारे यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण केली.

यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गटाचे जिल्हाध्यक्ष संजय गाडे, सुहास मोरे, विशालकुमार कांबळे,रेखाताई आदी पदाधिकारी व कार्यकर्ते, बंधुत्व जीवनगौरव पुरस्कार विजेते शिरीष जगम,परवेज सय्यद,दत्ता राऊत,अनिल वीर,मेघराज बनसोडे,विक्रम भंडारे,अविनाश मोरे,आनंद (नाना) बल्लाळ,अनिल खरात,नातेवाईक,भंडारे कुटुंबीय, उपासक-उपासिका व ग्रामस्थ उपस्थित होते.

श्रीमंत भंडारे यांनी आभारप्रदर्शन केले.

४० वर्षांचा अन्याय आता निर्णायक लढाईत!; हनुमान कोळीवाडा(शेवा कोळीवाडा)व नवीन शेवेच्या पुनर्वसनासाठी ग्रामस्थांचा एल्गार

बैठकीत सर्वपक्षीय पदाधिकारी कार्यकर्त्यांचा समावेश, सर्वच पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपोषणात होणार सहभागी.

तालुका प्रतिनिधी/ विठ्ठल ममतावादे

उरण : उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा(शेवा कोळीवाडा)व नवीन शेवे या गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न तब्बल ४० वर्षांपासून प्रलंबित असल्याने ग्रामस्थांचा संताप आता उफाळून आला आहे. जेएनपीए प्रकल्पासाठी स्थानिकांनी जमीन, घरे देऊन आणि पारंपरिक उपजीविकेवर परिणाम सहन करूनही पुनर्वसनाचा प्रश्न अद्याप पूर्णतास न गेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे आता 'आश्वासन नको, निर्णायक निर्णय हवा!' अशी आक्रमक भूमिका घेत ग्रामस्थांनी आंदोलनाची घोषणा केली आहे.

नवीन शेवा व शेवा कोळीवाडा (हनुमान कोळीवाडा) ग्रामस्थांच्या वतीने रविवार दिनांक ९ ऑगस्ट २०२६ रोजी संध्याकाळी ६ वाजता श्री शातेश्वरी मंदिर नवीन शेवा येथे महत्त्वाची बैठक संपन्न झाली.या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी रोजी जेएनपीए प्रशासन भवन समोर उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला.या बैठक प्रसंगी माजी आमदार मनोहरशेठ भोईर, पंचायत समिती सदस्य दिपक भोईर, सरपंच सोनल घरत,नवीन शेवा ग्रामसुधारणा मंडळचे अध्यक्ष कमळाकर पाटील,उपाध्यक्ष लक्ष्मण म्हात्रे, भाजप रायगड जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत,तंटामुक्ती समिती अध्यक्ष कृष्णा घरत,सल्लागार बाळकृष्ण पाटील,शाखाप्रमुख शैलेश भोईर,सल्लागार पंडित घरत, कॉम्रेसचे जेष्ठ नेते कमळाकर घरत,शिवसेनेचे गणेश म्हात्रे,ग्रामसुधारणा मंडळ हनुमान कोळीवाडा अध्यक्ष सुरेश कोळी,खजिनदार नितीन कोळी,माजी सरपंच परमानंद कोळी, सामाजिक कार्यकर्ते हरेश कोळी,नवीन शेवा ग्रामसुधारणा मंडळाचे सल्लागार हेमंत म्हात्रे, एकनाथ घरत, नवीन शेवा व हनुमान कोळीवाडा गावचे प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते.

सदरमहत्त्वाच्या बैठकीत शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर, नवीन शेवा ग्रामपंचायत सरपंच सोनल घरत, नवीन शेवा ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष कमळाकर पाटील, भाजपचे चंद्रकांत घरत, सल्लागार पंडीत घरत, शेवा कोळीवाडा (हनुमान कोळीवाडा)ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष सुरेश कोळी, माजी सरपंच परमानंद कोळी आदी पदाधिकारी मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.या बैठकीत पुनर्वसनाच्या प्रक्रियेत गेल्या ४० वर्षांपासून अन्याय व फसवणूक होत असल्याचा आरोप ग्रामस्थ व विस्थापितांमार्फत करण्यात आला आहे. तसेच २ बनावट अथवा चुकीचे आझापत्रे तयार करून जेएनपीए (एनएसपीटी) व शासनाने दोन्ही गावांची फसवणूक केल्याचा ग्रामस्थांचा दावा आहे. या गंभीर आरोपांची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणण्याची मागणी बैठकीत सर्वानुमते करण्यात आली आहे.'बनावट आझापत्रांमागील सत्य बाहेर काढा!' अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आले. ग्रामस्थांच्या तीन प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत. बनावट व चुकीची २ आझापत्रे रद्द करा तसेच त्या आझापत्रांने दिशाभूल करणाऱ्या कारभाराबाबत संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी, अशी पहिली मागणी आहे.



दुसरी विस्थापितांची फसवणूक केल्याच्या आरोपांची चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर १५ दिवसांत कठोर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.तर सर्वात महत्त्वाची मागणी म्हणजे नवीन शेवा आणि शेवा कोळीवाडा गावांचे न्याय व पूर्ण पुनर्वसन तातडीने करावे.अशा तीन मागण्या करण्यात आले.१५ ऑगस्टला जेएनपीए प्रशासन भवनासमोर उपोषण करण्यात येणार आहे.ग्रामस्थांनी आता आंदोलनाची ठोस दिशा जाहीर केली असून शनिवार, १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ वाजता जेएनपीए प्रशासन भवन समोर उपोषण करण्यात येणार आहे.

'४० वर्षांचा अन्याय... आता निर्णायक लढा!' असा निर्धार व्यक्त करत हजारोच्या संख्येने विस्थापित ग्रामस्थांनी आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. न्यायासाठी सर्वांनी एकजुटीने उभे राहण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.पुनर्वसनाचा प्रश्न केवळ प्रशासकीय फाईलमध्ये अडकवून ठेवण्याचाही वेळ आता संपली पाहिजे, अशी संतप्त भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

चार दशकांपासून प्रलंबित असलेल्या प्रस्नवार शासन आणि जेएनपीए प्रशासनाने कालबद्ध निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा बैठकीत देण्यात आला आहे.विस्थापित तसेच ग्रामस्थांच्या मते, पुनर्वसनाशी संबंधित सर्व आदेश, आझापत्रे, नोंदी आणि कागदपत्रांची पारदर्शक तपासणी करून पात्र विस्थापितांना काय्द्यानुसार न्याय मिळणे सरचिटणीस आहे. संबंधित प्रक्रणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.शेवा कोळीवाडा (हनुमान कोळीवाडा)आणि नवीन शेवेच्या ग्रामस्थांनी एकजूट, संघर्ष आणि विजय या निर्धाराने आंदोलनाची तयारी सुरू केली आहे.

१५ ऑगस्टच्या आंदोलनातून चार दशकांपासून प्रलंबित असलेल्या पुनर्वसनाच्या प्रश्नाला निर्णायक वळण देण्याचा ग्रामस्थांचा प्रयत्न आहे.'४० वर्षे अन्याय सहन केला; आता आणखी प्रतीक्षा नाही.असा संकल्प करण्यात आला असून बनावट व चुकीच्या आझापत्रांच्या आरोपांची चौकशी करा, दोषींवर कारवाई करा आणि शेवा कोळीवाडा गावातील ३६५ कुटुंबांचे शासनाचे मापदंडाने ई.१२/११/१९८२ते १५/०१/१९८८ सालात पायरी पायरीने मंजूर असलेले पूर्ण व न्याय पुनर्वसन करा,' अशी आक्रमक भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.आता या आंदोलनाची दखल घेऊन जेएनपीए प्रशासन, राज्य शासन आणि केंद्र शासन कोणती ठोस भूमिका घेतात, याकडे उरण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

दहेगाव-वायगाव-कात्री राज्य महामार्गाच्या रखडलेल्या कामाविरोधात ठिय्या आंदोलन



नगराध्यक्ष किरण ठाकरे यांच्या नेतृत्वात शेकडो नागरिकांचा संताप; रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी

आरती कारंजेकर

देवळी: २२६ कोटी खर्च करून बांधण्यात येत असलेला दहेगाव-देवळी-वायगाव-कात्री राज्य महामार्गाचे बांधकाम मागील एक वर्षापासून ठप्प असून, दहेगावपासून कात्रीपर्यंत संपूर्ण रस्ता दोन्ही बाजूंनी खोदून ठेवण्यात आला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक, विद्यार्थी, शेतकरी तसेच वाहनधारकांना या मार्गावरून ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने संपूर्ण रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

चिखलामुळे दुचाकी वाहने घसरून अनेक नागरिकांचे अपघात झाले असून, काही नागरिकांना गंभीर दुखापतींसह कायमस्वरूपी अपंगत्वाला सामोरे जावे लागल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. रस्त्याची दुरवस्था एवढी गंभीर झाली आहे की, शाळेच्या बसेसची वाहतूकदेखील बंद झाली असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा व सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या गंभीर समस्येकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी युवा संघर्ष मोर्चाच्या वतीने नगराध्यक्ष श्री. किरण ठाकरे यांच्या नेतृत्वात परिसरातील शेकडो नागरिकांनी सरूळ येथील नदी जवळ बसून ठिय्या आंदोलन केले. यावेळी नागरिकांनी लोकप्रतिनिधी व सार्वजनिक बांधकाम विभागाचे विरोधात जोरदार घोषणाबाजी करून परिसर दणानून सोडला, उपस्थित आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात तीव्र संताप व्यक्त करत रस्त्याचे बांधकाम तातडीने सुरू करण्याची मागणी केली.

'रस्ता खोदून ठेवून नागरिकांच्या जीवाशी खेळणे थांबवा, तातडीने काम सुरू करा,' अशी संतप्त मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. पावसाळ्यात या रस्त्यावर आणखी गंभीर अपघात होण्याची शक्यता असून, प्रशासनाने कोणतीही दुर्घटना घडण्याची वाट न पाहता तातडीने रस्त्याचे बांधकाम सुरू करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

रस्त्याचे काम त्वरित सुरू न झाल्यास युवा संघर्ष मोर्चाच्या वतीने चक्का जाम आंदोलन करण्याचा इशारा नगराध्यक्ष किरण ठाकरे यांनी यावेळी दिला. शेवटी दुपारी दोन वाजता सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी मुत्येलवार साहेब, प्रोजेक्ट मॅनेजर सोमकुमार, क्वालिटी कंट्रोल अधिकारी श्री माथुर हे आंदोलन स्थळी दाखल झाले, चर्चेअंती या रोडचे बांधकाम उद्यापासून सुरु करणार असल्याचे आश्वासन मिळाल्यानंतर सदर ठिय्या आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

या आंदोलनात नगराध्यक्ष किरण ठाकरे यांचे नेतृत्वात प्रविण कात्रे, ॲड. मंगेश घुंगरूड, संदीप दिघीकर, समीर सारजे, लोमहर्ष बाळबुधे, समीर इंगोले, गजानन वड्याळकर, सुभाष इंगोले, माधवराव शेंडे, रुपराव खैरकार दिलीप बाळबुधे, गौरव खोपाळ, प्रविण खाडे, मंगेश वानखेडे, वृषभ गोडे, समीर इंगोले, हरीश भालेराव, हनुमंत पचारे, सुधीर भगत, सुमित झोरे, गजानन ताकसांडे, किरण सरोदे, डेबे सर, किशोर इंगोले, प्रविण वानखेडे, उमेश इंगोले, मोहन उगेमुगे, शरद कांबळे, नारायण राऊत, प्रशांत गव्हाणकर, चेतन फुकट, गणेश निमसडकर, शालिक इंगळे, मुकेश गावंडे, प्रमोद साबळे, संजय आमटे, पिंटू सरोदे, नरेश सातपुते, प्रमोद वानखेडे, अशोक सातपुते, प्रविण इंगळे, शैलेंद्र थुल, अरविंद चौधरी, भारत डफरे, अनिकेत राऊत, अमित इंगळे, प्रविण थुल, गुणवंत इंगळे, तथागत वाघमारे, प्रशांत चौधरी परिसरातील नागरिक, विद्यार्थी, शेतकरी व युवा संघर्ष मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जागतिक आदिवासी दिनानिमित्त आर्वीत भोजनदान व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात

आर्वी, दि. ०९ ऑगस्ट : जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदर्श एकता सामाजिक संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी आर्वी शहरातील भीमसैनिक अशोकराव कुंभारे परिसर स्टेशन वॉर्ड येथील त्रिशरण बुद्ध विहार या परिसरात भोजनदान व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक एकतेचा संदेश देत हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

जागतिक आदिवासी दिन हा आदिवासी समाजाच्या समृद्ध संस्कृती, परंपरा, इतिहास, हक्क आणि सामाजिक योगदानाची जाणीव करून देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे. या दिवसाचे औचित्य साधून आदर्श एकता सामाजिक संघटनेच्या वतीने समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा आणि निसर्गाशी असलेले अतूट नाते जपण्याबरोबरच पर्यावरणाचे संरक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाचे नेतृत्व आदर्श एकता सामाजिक संघटना, महाराष्ट्र राज्यचे अध्यक्ष मा. गौतम भाऊ कुंभारे यांच्या कडे होते . त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मा. ज्ञानेश्वर लांडगे गोपाल आत्राम, रवी आत्राम, विनोद कांबळे , राजेंद्र वानखडे, प्रमोद घोडीले, विनोद सरोदे, विजय कुंभारे, राजू डोंगरे, शोभीत कुंभारे, तेजस डोंगरे, , राकेश वर्टी अनिता घोडीले , सुलुचना कुंभारे, शुभांगी कुंभारे जया सरोदे मेघा सरोदे, सुमन मेश्राम, चंदा डोंगरे, उपस्थित होते.

मान्यवरांच्या उपस्थितीत जागतिक आदिवासी दिनाचे महत्त्व, सामाजिक एकता, पर्यावरण संवर्धन आणि समाजातील प्रत्येक घटकाने सामाजिक कार्यात सहभागी होण्याची गरज यावर विचार मांडण्यात आले.

जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते वृक्षांची लागवड करण्यात आली. केवळ वृक्षारोपण करून न थांबता लावलेल्या झाडांचे संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारीही स्वीकारणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

आदिवासी समाजाचे जीवन हे निसर्ग, जंगल, जमीन आणि पर्यावरणाशी जोडलेले आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे ही केवळ सामाजिक नव्हे तर भावी पिढीप्रती असलेली जबाबदारी आहे. 'एक झाड लावा, एक झाड जगवा' या भावनेतून नागरिकांनी पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

वृक्षारोपणासोबतच उपस्थित नागरिक, समाजबांधव आणि कार्यक्रमासाठी आलेल्या मान्यवरांसाठी भोजनदानाचा उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक कार्यातून समाजातील गरजू आणि सर्वसामान्य नागरिकांशी आपुलकीचे नाते निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

भोजनदानाच्या माध्यमातून सामाजिक समता, बंधुभाव आणि माणुसकीचा संदेश देण्यात आला. विविध जाती, धर्म व सामाजिक घटकांनी एकत्र येऊन समाजहिताचे कार्य करणे हीच सामाजिक एकतेची खरी ताकद असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.



कार्यक्रमादरम्यान आदिवासी समाजाचा इतिहास, परंपरा, कला, संस्कृती आणि निसर्गाशी असलेले नाते जपण्याची गरज व्यक्त करण्यात आली. बदलत्या काळात आधुनिकतेचा स्वीकार करताना आपल्या पारंपरिक संस्कृतीचे आणि सामाजिक मूल्यांचे जतन करणे आवश्यक असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

तसेच युवकांनी शिक्षण, सामाजिक जागृती आणि पर्यावरण संवर्धनाच्या माध्यमातून समाजाच्या विकासात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

सामाजिक एकतेचा संदेश

आदर्श एकता सामाजिक संघटनेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबवून समाजात एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. जागतिक आदिवासी दिनानिमित्त आयोजित हा कार्यक्रमही त्याच सामाजिक बांधिलकीचा एक भाग असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, समाजबांधव आणि युवकांची उपस्थिती लाभली. उपस्थितांनी वृक्षारोपण व भोजनदानासारख्या समाजोपयोगी उपक्रमांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. अमर भोगे यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपस्थित मान्यवर, नागरिक, कार्यकर्ते आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या माध्यमातून 'सामाजिक एकता, पर्यावरण संवर्धन आणि माणुसकी' हा संदेश देत जागतिक आदिवासी दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

पवित्र पोर्टलवर प्राधान्यक्रम लॉक करण्यास १३ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ



मुंबई : शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (टीएआयटी)-२०२५ अंतर्गत पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक पदभरतीसाठी प्राधान्यक्रम लॉक करण्याची मुदत ११ ऑगस्टऐवजी १३ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. संकेतस्थळावरील भार लक्षात घेऊन उमेदवारांना अडचणी येऊ नयेत यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली असून, उमेदवारांनी वाढीव मुदतीत प्राधान्यक्रम लॉक करावेत, असे आवाहन शालेय शिक्षण विभागामार्फत करण्यात आले आहे.

पवित्र पोर्टलवर स्व-प्रमाणपत्र पूर्ण केलेल्या १ लाख ७० हजार १०८ उमेदवारांकडून प्राधान्यक्रम जनरेट करणे आणि ते लॉक करण्याची कार्यवाही सुरू आहे. १० ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत मुलाखतीशिवाय १ लाख १० हजार ७६५, तर मुलाखतीसह ९२ हजार ८९४ उमेदवारांचे प्राधान्यक्रम जनरेट झाले आहेत. यापैकी मुलाखतीशिवाय १९ हजार ४४५ उमेदवारांनी तर मुलाखतीसह ७६७२ उमेदवारांनी प्राधान्यक्रम लॉक केले आहेत.

पोर्टलवर लॉगिन करण्यासाठी किंवा प्राधान्यक्रम लॉक करण्यासाठी ओटीपी आवश्यक आहे. एकाच वेळी मोठ्या संख्येने उमेदवार लॉगिन करीत असल्याने ओटीपी मिळण्यास विलंब होऊ शकतो. त्यामुळे ओटीपी न मिळाल्यास काही काळ प्रतीक्षा करावी आणि तातडीने 'रिसेंड'वर क्लिक करू नये. उशिराने आलेला ओटीपीही स्वीकारला जातो. काही काळानंतरही ओटीपी न मिळाल्यास 'रिसेंड' पर्यायाचा वापर करता येईल.

ओटीपी मिळण्यात अडचण येणाऱ्या उमेदवारांनी वापरत असलेल्या ब्राउझरची हिस्ट्री आणि कॅशे क्लिअर करावी. त्यानंतरही समस्या कायम राहिल्यास 'इन्कॉग्निटो विंडो' किंवा 'प्रायव्हेट विंडो'चा वापर करावा. आदिवासी विकास विभागाच्या उच्च माध्यमिक विभागातील विज्ञान शाखेच्या बायोलॉजी, केमिस्ट्री, फिजिक्स आणि मॅथेमॅटिक्स या विषयांचे प्राधान्यक्रम इंग्रजी माध्यमातील उमेदवारांना विभागाच्या ८ ऑगस्ट २०२६ रोजीच्या पत्रानुसार उपलब्ध करून देण्यात येत आहेत. संबंधित उमेदवारांनी याची नोंद घ्यावी, असे विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

नवउद्योजकांनी 'मार्जिन मनी' योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

मुंबई : केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नवउद्योजकांसाठी मार्जिन मनी उपलब्ध करून देण्याची योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येत आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुंबई उपनगरचे सहायक आयुक्त समाज कल्याण रविकिरण पाटील यांनी केले आहे.

केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत राज्यातील अनुसूचित जातीच्या सवलती घेण्यास पात्र असलेले अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील नवउद्योजक लाभार्थ्यांना प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या लाभार्थी यांच्या हिश्श्यामधील २५ टक्के मधील जास्तीत जास्त १५ टक्के पर्यंत मार्जिन मनी उपलब्ध करून देण्यात येत आहे. यासंदर्भात विभागाच्या ८ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयात योजनेच्या अटी व शर्ती, आवश्यक कागदपत्रांची माहिती व प्रस्ताव सादर करण्याची कार्यपद्धती स्पष्ट करण्यात आलेली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, आर. सी. मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई – ४०००७१ या पत्त्यावर अर्ज करावा. कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२२-२५२२२०२३ हा असून ई-मेल आय डी ^ैदस्र्ल्र्ैग्लुॅर्ैग्.म्दस हा असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

भटके-विमुक्त समाजातर्फे डॉ. शिवलाल जाधव यांचा 'शिक्षणमहर्षी' पुरस्काराने गौरव

कैलास गायकवाड / विशेष प्रतिनिधी

वाघोली ता. हवेली भटके, विमुक्त, आदिवासी तसेच रस्त्यावरील निराधार मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गेली तब्बल ६० वर्षे अविरत कार्य करणारे डॉ. शिवलाल जाधव यांचा भटके-विमुक्त समाजातर्फे 'शिक्षणमहर्षी' पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला.महाराष्ट्र भटके-विमुक्त तसेच कैकाडी समाजाच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीची बैठक महाराष्ट्र कैकाडी समाजाचे संस्थापक-अध्यक्ष श्री. एस. एल. गायकवाड, समाजाचे गुरु श्री. शंकर स्वामी (उज्जैन) तसेच निवृत्त सहाय्यक आयुक्त व महाराष्ट्र नाथपंथी महासंघाचे अध्यक्ष श्री. मच्छिंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी डॉ. जाधव यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून त्यांना 'शिक्षणमहर्षी' पुरस्कार प्रदान करण्यात आला.



बैठकीत कैकाडी समाजासह भटके-विमुक्तांच्या सर्व ४२ जमातींनी एकत्र येऊन एसटी आरक्षण मिळवून देण्यासाठी एकजुटीने लढा उभारण्याचा एल्गार केला. समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करून संघटन अधिक बळकट करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास महाराष्ट्र महिला अध्यक्षा सौ. उर्मिला पवार, ?ड. रेखा माने, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नारायण गायकवाड, मा. निलकंठ भोसले, मा. गुरुनाथ गायकवाड तसेच महाराष्ट्रभरातील अनेक प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


याच कार्यक्रमात कैकाडी समाजातील कु. स्वाती गणेश गायकवाड हिने एसएससी बोर्ड मार्च २०२६ परीक्षेत ९०.२० टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला. तसेच तिच्या यशाबद्दल मुख्याध्यापक श्री. जितेंद्र सोनावणे आणि शाळेतील सर्व शिक्षकांचेही अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन श्री. गोकुळ शिरोरे आणि श्री. गणेश राहणे यांनी केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

सिंदी रेल्वे स्थानक बनले दारुड्यांचा अड्डा!

- स्थानकाच्या पादचारी पुलावर दारूच्या बाटल्या अन् मद्यपींचा वावर
- प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात
- शहरात खुलेआम अवैध दारूविक्री सुरू असल्याचा नागरिकांचा आरोप
- पोलिसांच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह







सेलू / प्रशांत झाडे

सिंदी शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना आता सिंदी रेल्वे स्थानक परिसरही दारुड्यांचा अड्डा बनत असल्याचे चित्र समोर आले आहे. रेल्वे स्थानकाच्या पादचारी पुलावर दारूची बाटली, प्लास्टिकच्या पिशव्या व खाण्याचे साहित्य अस्ताव्यस्त पडलेले असल्याचे छायाचित्रातून दिसून येत आहे. त्यामुळे रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेबरोबरच स्थानकाच्या स्वच्छतेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

सिंदी शहरात विविध ठिकाणी अवैध दारूची खुलेआम विक्री होत असल्याचा आरोप नागरिकांकडून सातत्याने केला जात आहे. शहरातील काही भागांत दारू सहज उपलब्ध होत असल्याने मद्यपींचा वावर वाढला असून, त्याचा परिणाम सार्वजनिक ठिकाणांवरही दिसून येत आहे. रेल्वे स्थानकासारख्या महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून बाटल्या व कचरा टाकला जात असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

विशेषतः महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. रेल्वे स्थानक परिसरात नियमित गस्त, तपासणी आणि संशयित व्यक्तींवर कारवाई करण्याची गरज असताना प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

दरम्यान, सिंदी शहरात अवैध दारूविक्रीला आळा घालण्यासाठी पोलिसांकडून प्रभावी कारवाई का होत नाही, असा सवालही नागरिक उपस्थित करीत आहेत. अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कारवाई होत नसल्याने त्यांचे मनोबल वाढले आहे, अशी भावना नागरिकांमध्ये आहे. पोलिसांवर 'हप्तेखोरी'चे आरोपही नागरिकांकडून केले जात असले, तरी या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे पोलिस प्रशासनाने या आरोपांबाबत स्पष्टता देण्याची मागणी होत आहे.

सिंदी रेल्वे स्थानक हे प्रवाशांसाठी सुरक्षित ठिकाण असावे, दारुड्यांचा अड्डा नव्हे, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत असून, आता पोलीस व रेल्वे प्रशासन या गंभीर प्रकाराची दखल घेऊन काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

प्रशासनाने तातडीने कारवाई करावी

रेल्वे स्थानक परिसरात नियमित पोलीस गस्त वाढवावी, सीसीटीव्हीच्या माध्यमातून मद्यपी व असामाजिक तत्त्वांवर लक्ष ठेवावे, तसेच स्थानक परिसरात मद्यपान करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रवासी व नागरिकांकडून होत आहे. त्याचबरोबर शहरातील अवैध दारूविक्रीच्या ठिकाणांचा शोध घेऊन संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची गरज आहे.

अवैध दारूविक्रीवर कठोर कारवाई करा!

सिंदी रेल्वे स्थानकाचा पादचारी पूल दारूच्या बाटल्यांनी भरत असेल, तर हा केवळ अस्वच्छतेचा प्रश्न नाही. ही प्रशासनाच्या निष्क्रियतेची गंभीर बाब आहे. महिला, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेशी खेळ सुरू असताना प्रशासनाने डोळेझाक न करता अवैध दारूविक्री आणि मद्यपींच्या वावरावर तातडीने कठोर कारवाई करावी.

अमित सातपुते
प्रवाशी सिंदी (रेल्वे).

आवारा कुत्र्यांचा आर्वी शहरात धुमाकूळ; नागरिकांमध्ये दहशत

गाडीमागे धावणाऱ्या कुत्र्यांमुळे अपघातांची मालिका; नगरपरिषदेने तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी



आर्वी : शहरातील गांधी चौक, इंदिरा चौक, साईनगर तसेच अगस्ती मार्ग परिसरात आवारा कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्त्यावर झुंडीने फिरणारे कुत्रे अचानक दुचाकीस्वार तसेच पादचाऱ्यांच्या मागे धावत असल्याने दररोज किरकोळ-मोठे अपघात घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.कुत्रे मागे लागल्याने घाबरलेल्या दुचाकीस्वारांचा वाहनावरील ताबा सुटून ते रस्त्यावर पडत आहेत. यामध्ये अनेकांना हात-पायांना दुखापत झाल्याच्या घटना घडल्या आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी कुत्र्यांच्या झुंडी रस्त्यावर ठाण मांडून बसत असल्याने नागरिकांना मोठ्या भीतीने मार्गक्रमण करावे लागत आहे.कुत्रा चावा घेईल या भीतीनेच नागरिक घाबरून वाहनाचा वेग वाढवतात आणि त्यातून अपघात होण्याचा धोका निर्माण होत आहे. अनेक ठिकाणी कुत्र्यांचे कळप अचानक वाहनांच्या मागे धावत असल्याने वाहनचालकांमध्ये घबराट निर्माण होते.

आवारा कुत्र्यांच्या समस्येकडे वेळीच लक्ष न दिल्यास भविष्यात एखादा मोठा अपघात किंवा गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापूर्वीही आवारा कुत्र्याच्या चाव्यामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडल्याने नागरिकांमध्ये अधिकच चिंता निर्माण झाली आहे.

त्यामुळे नगरपरिषदेने तातडीने आवारा कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रभावी मोहीम राबवावी, कुत्र्यांचे निर्बीजीकरण व आवश्यक ती कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन नगरपरिषदेने या गंभीर समस्येवर त्वरित उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

स्वातंत्र्य दिनानिमित्त आर्वीत थरार!

आमदार सुमित वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली 'भव्य राज्यस्तरीय सायकल रेस' स्पर्धेचे आयोजन

आर्वी: स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून आमदार सुमित वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता युवा मोर्चा (भाजयुमो), आर्वी शहर व ग्रामीणतर्फे क्रीडाप्रेमी आणि सायकलपटूंसाठी एका भव्य 'राज्यस्तरीय सायकल रेस स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले आहे.

१५ ऑगस्ट रोजी रंगणाऱ्या या थरारक स्पर्धेत शेकडो सायकलपटू सहभागी होणार असून, आर्वीकरांना एक अभूतपूर्व आणि रोमांचक क्रीडामहोत्सव अनुभवता येणार आहे. तरुणांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी व आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



ही स्पर्धा शनिवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता शासकीय विश्रामगृहा समोर, मेन रोड, आर्वी येथून सुरू होईल. स्पर्धा फक्त पुरुष खुला गटासाठी आयोजित करण्यात आली असून, अंतिम नोंदणीची तारीख १३ ऑगस्ट २०२६ निश्चित करण्यात आली आहे. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्यांसाठी आकर्षक रोख पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. प्रथम पारितोषिक रु.२५,००१/- (भाजयुमो आर्वीतर्फे), द्वितीय पारितोषिक रु. १५,००१/- (भाजपा आर्वीतर्फे), तर तृतीय पारितोषिक रु.७,००१/-(भाजपा महिला मोर्चा आर्वीतर्फे) दिले जाणार आहे.

याशिवाय सर्व सहभागी स्पर्धकांना प्रोत्साहनपर बक्षीस देऊन गौरविले जाणार आहे. आमदार सुमित वानखेडे यांच्या प्रेरणेने आयोजित या भव्य स्पर्धेत आर्वी शहर व परिसरातील जास्तीत जास्त तरुण, खेळाडू आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या क्रीडामहोत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी व नावनोंदणीसाठी स्थानिक कळाळे (९७६६९७३१८४), आशिष टिकले (९८२३५३०८२८), रवि गाडगे (९८३४४०९१३८), सुमित शिंगाणे (९७३०५९०५९६) व अमोल पांडे (८३२९०२७८५४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



महाराष्ट्राकडून देशाला हरित वाहतुकीचे दिशादर्शन : मंत्री प्रताप सरनाईक

७ ते ५५ टन क्षमतेच्या इलेक्ट्रिक ट्रकच्या संपूर्ण श्रेणीचे अनावरण

मुंबई : 'आजचा दिवस केवळ नवीन इलेक्ट्रिक ट्रकच्या लॉन्चचा नाही, तर भारताच्या हरित आणि शाश्वत वाहतूक क्रांतीचा महत्वपूर्ण टप्पा आहे. बॅटरी व इलेक्ट्रिक ट्रकसाठी स्वतंत्र धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असून, महाराष्ट्र पुन्हा एकदा देशाला हरित वाहतुकीची दिशा दाखवत आहे,' असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

टाटा मोटर्सने ७ ते ५५ टन क्षमतेच्या भारतातील पहिल्या संपूर्ण बॅटरी इलेक्ट्रिक ट्रक श्रेणीचे सादरीकरण केले. या ऐतिहासिक प्रसंगी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्र सरकारने इलेक्ट्रिक वाहन उद्योगासाठी अनुकूल धोरणात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. राज्याच्या ई धोरणामुळे वाहन उत्पादक, उद्योग आणि वाहतूक क्षेत्राला नव्या संधी उपलब्ध होत आहेत. 'पुण्यात भारतीय अभियंत्यांनी डिझाइन आणि विकसित केलेले हे इलेक्ट्रिक ट्रक म्हणजे 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांचे उत्तम उदाहरण आहे. भारतीय कौशल्य, तंत्रज्ञान आणि उत्पादनक्षमता यांची ताकद या वाहनांमधून दिसून येते,' असे सरनाईक यांनी सांगितले.

पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर वाहतूक

इलेक्ट्रिक ट्रकच्या माध्यमातून प्रदूषण कमी करण्याबरोबरच वाहतूकदारांचा इंधनावरील खर्च आणि एकूण ऑपरेटिंग खर्च कमी होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वाहतूक व्यवसाय अधिक किफायतशीर, स्पर्धात्मक आणि शाश्वत बनेल, असा विश्वास परिवहन मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला. प्रधानमंत्री मोदी यांनी २०७० पर्यंत 'नेट-झिरो'चे लक्ष्य निश्चित केले आहे. हे लक्ष्य साध्य करण्यासाठी वाहतूक क्षेत्राचे विद्युतीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. इलेक्ट्रिक ट्रक ही त्या दिशेने टाकलेली निर्णायक पावले आहेत,' असेही त्यांनी नमूद केले.

३५० किमीपर्यंत रेंज; फास्ट चार्जिंगमुळे उत्पादकता वाढणार

या इलेक्ट्रिक ट्रकची एका चार्जमध्ये सुमारे ३५० किलोमीटरपर्यंतची रेंज, फास्ट चार्जिंगची सुविधा आणि कमी ऑपरेटिंग खर्च ही महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. कमी वेळेत चार्जिंग पूर्ण झाल्याने ट्रक अधिक वेळ रस्त्यावर धावू शकतो आणि वाहतूकदारांची उत्पादकता वाढू शकते. 'हा ट्रक केवळ पर्यावरणपूरक नाही, तर वाहतूकदार आणि चालकांसाठी अधिक फायदेशीर, विश्वासार्ह आणि किफायतशीर पर्याय ठरणार आहे. भविष्यातील व्यावसायिक वाहतुकीची दिशा आता स्पष्ट झाली आहे,' असे सरनाईक म्हणाले.

सरकार–उद्योग भागीदारीला चालना

महाराष्ट्राच्या ईव्ही धोरणासोबतच केंद्र सरकारच्या पीएम-ई-ड्राइव्ह योजनेच्या माध्यमातून इलेक्ट्रिक मोबिलिटीला प्रोत्साहन दिले जात आहे. सरकार, वाहन उत्पादक आणि वाहतूकदार यांच्यातील प्रभावी भागीदारीमुळे देशात इलेक्ट्रिक व्यावसायिक वाहनांचा वापर वेगाने वाढेल, असे त्यांनी सांगितले. इलेक्ट्रिक मोबिलिटीमुळे केवळ वाहन उद्योगातच नव्हे, तर बॅटरी तंत्रज्ञान, संशोधन-विकास, उत्पादन, चार्जिंग पायाभूत सुविधा आणि वाहन सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार व कौशल्य विकासाच्या संधी निर्माण होतील, असेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

'आज आपण केवळ इलेक्ट्रिक ट्रकचे लॉन्चिंग करत नाही, तर स्वच्छ, आत्मनिर्भर आणि शाश्वत भारताच्या भविष्याचा मार्ग खुला करत आहोत. महाराष्ट्र या परिवर्तनात केवळ सहभागी राहणार नाही, तर त्याचे नेतृत्व करेल,' असा विश्वास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

आई-वडिलांच्या डोळ्यांत अश्रू आणणार नाही! 'पोलीस-युवा महासंवादात' देवळीतील विद्यार्थ्यांचा काळीज पिळवटणारा निर्धार..



प्रतिनिधी /आरती कारंजेकर

देवळी : जन्मापासून स्वतःच्या इच्छा-आकांक्षा मारून लेकरांच्या सुखासाठी ढसे आयुष्य झिजवणाऱ्या माय-बापांना त्यांच्याच मुलांमुळे पोलीस ठाण्याची पायरी चढावी लागावी, यापेक्षा मोठे सामाजिक दुर्दैव ते कोणते ? 'काहीही झाले तरी आई-वडिलांची मान शरमेने खाली झुकू देणार नाही आणि त्यांना पोलीस ठाण्यात उभे राहण्याची वेळ येऊ देणार नाही!' असा काळीज पिळवटून टाकणारा निर्धार करत देवळीतील हजारो विद्यार्थ्यांनी पालकांविषयी कृतज्ञतेची शपथ घेतली.

वर्धा जिल्हा पोलीस दलाच्या वतीने 'पोलीस ठाणे देवळी' अंतर्गत विदर्भ केसरी रामदास तडस इनडोअर स्टेडियम येथे 'पोलीस-युवा महासंवाद' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रसिद्ध व्याख्याते वर्से हंकारे यांनी 'न' न समजलेले माय-बाप' ड या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन करताना आधुनिक काँट्रॅबिक नात्यांमधील विदारक वास्तव मांडले.

सोशल मीडियाचा अतिरेक आणि भरकटणारी तरुणाई...

आपल्या ओघवत्या शैलीत बोलताना वर्से हंकारे म्हणाले, 'मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आभासी जगात आजची तरुणाई भरकटत चालली आहे. क्षणिक आकर्षणाला प्रेम समजून मुली खोट्या जाळ्यात अडकत आहेत, तर दुसरीकडे तरुण पिढी व्यसनाधीनतेच्या गर्तेत ढकलली जात आहे. ज्या आई-वडिलांनी आपल्या रक्ताचे पाणी करून मुलांना मोठे केले, त्यांनाच आयुष्याच्या उत्तरार्धात दोन शब्दांच्या आपुलकीसाठी आणि आधारासाठी आसुसलेले राहावे लागते, हे आजचे कटू सत्य आहे.' त्यांच्या या हृदयस्पर्शी वक्तव्याने स्टेडियममधील वातावरण कमालीचे भावूक झाले होते.

या महासंवादात विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले:

डॉ. रोजीना राणा (मानसोपचारतज्ज्ञ, नागपूर): करिअर घडवण्यासाठी योग्य मानसिक दिशा आणि ध्येय निश्चिती यावर प्रकाश टाकला.

डॉ.तन्मयदीक्षित(सायबर एक्सपर्ट, नाशिक): सोशल मीडियाचा गैरवापर, सायबर गुन्हे आणि त्यापासून स्वतःचा बचाव कसा करावा, याचे व्यावहारिक धडे दिले.

डॉ. सुधीर भावे: वाढती व्यसनाधीनता आणि त्याचे शारीरिक, मानसिक व सामाजिक स्तरावर होणारे घातक परिणाम यावर मार्गदर्शन केले.

अनोळखी नात्यांपासून सावध राहा!

अनोळखी व्यक्तींशी संवाद न वाढवणे, कोणत्याही छळाला किंवा त्रासाला न घाबरता तातडीने पोलिसांशी संपर्क साधून मदत मागणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे या प्रसंगी सांगण्यात आले.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये पार पडलेल्या

या कार्यक्रमाला वर्ध्याचे अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ. वंदना कारखेले, आणि देवळीचे ठाणेदार संदीप कापडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय देवळीतील विविध शाळा-महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आई-वडिलांच्या

त्यागाची जाणीव ठेवून सन्मानाने जगण्याचा आणि कुठल्याही चुकीच्या मार्गाला न जाण्याचा वस्तुपाठच या कार्यक्रमाच्या माध्यमातून देवळीतील तरुणाईला मिळाला.

मोबाईल लोकेशन ठरले 'जीवनरक्षक'; सेलू पोलिसांनी वैद्यकीय विद्यार्थ्याचे प्राण वाचविले



सेलू/प्रशांत झाडे

नागपूर येथे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याने आत्महत्येचा प्रयत्न करीत वर्धेकडे येत असताना रस्त्यालगतच्या विहिरीत उडी घेतली. मात्र, मोबाईल लोकेशनच्या आधारे सेलू पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवून या विद्यार्थ्याला विहिरीतून सुखरूप बाहेर काढले. पोलीसांच्या प्रसंगावधानामुळे एका तरुणाचे प्राण वाचले.

पोलिसांना ५ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजता सक्करदरा पोलिस ठाण्याकडून संबंधित विद्यार्थ्याबाबत माहिती मिळाली. विद्यार्थी नागपूरहून मोटारसायकलने वर्ध्याकडे निघाला असून, आत्महत्या करण्याचा त्याचा मानस असल्याचे समजताच सेलू पोलिसांनी तत्काळ हालचाली सुरू केल्या.

ठाणेदार पंकज वाघोडे यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शोधमोहीम राबविण्याचे आदेश दिले. सहाय्यक फौजदार जावेद धामीया, पोलिस हवालदार मंगेश राऊत व चालक पोलिस हवालदार विनोद कोडापे यांनी विद्यार्थ्याच्या मोबाईलचे लोकेशन ट्रेस केले. लोकेशनच्या आधारे नागपूर-वर्धा मार्गावरील महाबळा बसस्टॉप ते कोटंबा फाटा परिसरात शोध घेण्यात आला.

याचदरम्यान रस्त्यालगतच्या शेतातील एका विहिरीत विद्यार्थ्याने उडी मारल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता स्थानिक पोहणाऱ्या नागरिकांच्या मदतीने त्याला विहिरीतून बाहेर काढले. त्यानंतर त्याचे समुपदेशन करण्यात आले. तसेच सेलू ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले. प्रकृती स्थिर झाल्यानंतर विद्यार्थ्याला नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.

पोलिसांच्या सतर्कतेचे कौतुक

पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे व उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. मोबाईल लोकेशनचा अचूक मागोवा घेत वेळेत घटनास्थळी पोहोचणे आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने विद्यार्थ्याला सुरक्षित बाहेर काढणे, यामुळे सेलू पोलिसांची कार्यतत्परता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

वेळीच मिळालेली माहिती आणि पोलिसांचे प्रसंगावधान ठरले जीवनदान! या कारवाईबद्दल सेलू पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

'आत्महत्येच्या प्रयत्नाला दिला वेळीच ब्रेक; विहिरीतून सुखरूप बाहेर काढत केले समुपदेशन'

राज्यभर प्रत्येक विभागात लोककलांचा महोत्सव करणार - मंत्री ॲड. आशिष शेलार

मुंबई : सध्या विविध लोककलांचे महोत्सव सुरु असून यापुढील काळात राज्याच्या सर्व विभागात भव्य स्वरुपात लोककला महोत्सव आयोजित करण्यात येतील, अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी केली.

अखिल भारतीय लोककलावंत, मराठी तमाशा परिषद महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे पद्मश्री रघुवीर खेडकर यांचा सन्मान सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्याहस्ते रवींद्र नाट्य मंदिरात करण्यात आला, तर मंत्री आशिष शेलार यांचाही लोककलावंताच्या वतीने यावेळी सन्मान करण्यात आला. लोककला अभ्यासक प्रकाश खांडगे यांच्या उपस्थितीत व तमाशा परिषद अध्यक्ष संभाजीराजे जाधव यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला वसंतराव जगताप, खंडूराज गायकवाड, गणेश चंदनशिवे, आविष्कार मुळे, शोभराव गोपाळ, सुनील वाडेकर यांच्यासह राज्यभरातून विविध कला सादर करणारे लोककलावंत मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी तमाशा परिषदेतर्फे पठ्ठेबापूराव यांच्या नावे मरणोत्तर पुरस्कार योजना सुरु करुन लोककलेतील दिवंगत कलावंतांना मरणोत्तर पुरस्कार देण्यात यावे, विठाबाई नारायणगावकर स्मारकाचे काम लवकरात लवकर व्हावे, पेंशन योजना तसेच इतर बाबी तपासण्यासाठी शासनाने एक समिती गठीत करावी, ढोलकी फडाचा तमाशा आणि संगीतबारी याबाबत नियुक्त अभ्यास गटाच्या अहवालानुसार शासन निर्णय काढण्यात यावा व काही जिल्ह्यात तमाशाला पोलिसांकडून परवानगी नाकारली जाते त्याबद्दल पोलिसांना सूचना देण्यात याव्यात, अशा विविध मागण्यांचे निवेदन मंत्री ?ड शेलार यांना देण्यात आले. त्यावर येत्या पंधरा दिवसात बैठक करुन चर्चा करुन योग्य निर्णय करु, असे मंत्री ?ड. शेलार यांनी यावेळी सांगितले. तसेच त्यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्रातील लोककला व लोककलावंत यांच्या कार्याचा गौरव केला.



झाडे कटाई ची माहिती ग्रामपंचायतला कोण देणार? दरवर्षी लावणारी झाडे वाढत का नाही

काटोल/ प्रशांत पवार विजय डहाट यांचा संतप्त सवाल

रिधोरा ग्रामपंचायत अंतर्गत जाईल असे रिधोरा येथील निवासी येणाऱ्या रस्त्यालगतची झाडे दरवर्षी विद्युत वितरण कंपनीच्या ठेकेदारामार्फत अथवा अनोळखी लोकांमार्फत कापली जातात याची भनक सुद्धा ग्रामपंचायतला लागत नाही याचे आश्चर्य समाजसेवक विजय डहाट यांनी व्यक्त केले दरवर्षी ग्रामपंचायत रिधोरा अंतर्गत झाडांची लागवड केल्या जाते परंतु ती वाढत नाही काय आधीच वाढलेली झाडे छाटली जातात प्रसंगी कापली जातात यामुळे रिधोरा सावळी तसेच खापरी गावातील नैसर्गिक वातावरण हिरवेगार ठेवण्यास अडथळा निर्माण होत असून याकडे ग्रामपंचायत प्रशासनाने लक्ष ठेवले पाहिजे व विद्युत वितरण कंपनीचे ठेकेदार यांनी कापलेली झाडे रस्त्यावरच सोडून रहदारीला अडथळा निर्माण होईल असे कुठलेही कृत्य यापुढे केल्यास त्यांच्यावर तक्रार दाखल करून गुन्हा दाखल करण्यासाठी न्यायालयाचे दार ठोठावल्या आहेत,' असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी ग्रामपंचायत रिधोरा अंतर्गत येणाऱ्या रस्त्यालगतची झाडे दरवर्षी विद्युत वितरण कंपनीच्या ठेकेदारामार्फत अथवा अनोळखी लोकांमार्फत कापली जातात याची भनक सुद्धा ग्रामपंचायतला लागत नाही याचे आश्चर्य समाजसेवक विजय डहाट यांनी व्यक्त केले दरवर्षी ग्रामपंचायत रिधोरा अंतर्गत झाडांची लागवड केल्या जाते परंतु ती वाढत नाही काय आधीच वाढलेली झाडे छाटली जातात प्रसंगी कापली जातात यामुळे रिधोरा सावळी तसेच खापरी गावातील नैसर्गिक वातावरण हिरवेगार ठेवण्यास अडथळा निर्माण होत असून याकडे ग्रामपंचायत प्रशासनाने लक्ष ठेवले पाहिजे व विद्युत वितरण कंपनीचे ठेकेदार यांनी कापलेली झाडे रस्त्यावरच सोडून रहदारीला अडथळा निर्माण होईल असे कुठलेही कृत्य यापुढे केल्यास त्यांच्यावर तक्रार दाखल करून गुन्हा दाखल करण्यासाठी न्यायालयाचे दार ठोठावल्या आहेत,' असेही त्यांनी नमूद केले.

ज्येष्ठ नागरिक मंडळ काटोल - तज्ज्ञांकडून ज्येष्ठांना आरोग्य विषयक मार्गदर्शन

काटोल/ प्रशांत पवार

ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घेणे, त्यांचे मनोरंजन, त्यांच्या अडीअडचणी सोडविणे व त्यांच्या जीवनात सहल काढून विरंगुळा निर्माण करणे हे कार्य ज्येष्ठ नागरिक मंडळ काटोल द्वारा सातत्याने केले जाते.

हाच वसा कायम ठेवून दिनांक १० ऑगस्ट २०२६ ला मंडळाचे विरंगुळा केंद्रात ज्येष्ठांना उतारवयात भेडसावणाऱ्या आजारा संबंधाने मार्गदर्शन करण्याकरिता काटोल येथील तज्ञ डॉक्टर चे मार्गदर्शन - व्याख्यान आयोजित करण्यात आलेले होते.

मंडळाचे अध्यक्ष श्री गजाननराव भोयर यांचे अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमाची सुरुवात 'खरा तो एकची धर्म' या सामूहगीताने करण्यात आली. तसेच दिवंगत सभासदांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

मंचावर उपस्थित मंडळाचे अध्यक्ष गजाननराव भोयर, उपाध्यक्ष सूर्याजी राऊत, सचिव अशोकराव



काकडे, संचालक रमेश तिजारे, श्रीमती बेबीताई रोडे यांचेसह विशेष निमंत्रित डॉ. सारांशा बारई एमडी (मेडिसिन), तसेच दंत चिकित्सक डॉ. निखिल होले (एमडीएस) व डॉ. आदिती होले (एमडीएस) उपस्थित होते. निमंत्रित पाहुण्यांचा शाल व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठांना उतारवयात उद्भवणारे आजार - हृदयविकार, किडनी, लिव्हर, हाडांचे आजार, डोळ्यांचे विकार, शुगर - बीपी कमी- जास्त होणे, चक्कर येणे, या आजाराची लक्षणे काय व आजार होऊ नये यासाठी काय काळजी घ्यावी, आजार झाल्यास त्याचे तज्ञ डॉक्टर कडून नियमितपणे रोगनिदान करून घ्यावे व त्यावर तज्ञ डॉक्टर कडून योग्य उपचार करून घ्यावा. वासंबंधी डॉ. सारांश बारई यांनी विशेष मार्गदर्शन केले.

सध्याच्या काळात खानपानाच्या सवयी बदलल्यामुळे लहानापासून तर ज्येष्ठापर्यंत दाताचे विकार बाढलेले आहेत. दातांचे कोणते विकार होतात, त्याचा त्रास काय, दाताचे विकार होऊ नये, यासाठी काय काळजी घ्यावी तसेच या विकारावर असलेले उपाय - उपचार संबंधाने सविस्तर मार्गदर्शन दंतचिकित्सक डॉ.निखिल होले यांनी केले.

उपस्थित ८० ज्येष्ठापैकी २४ ज्येष्ठांना दुपट्टा व २ महिलाना स्कार्प देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला. उपस्थितांना खजूर वर्षी देऊन त्यांचे तोंड गोड करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन मंडळाचे सचिव श्री अशोकराव काकडे व संचालिका बेबीताई रोडे यांनी केले. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाचे यशस्वीते करिता मंडळाचे अध्यक्ष गजाननराव भोयर, सचिव अशोकराव काकडे, उपाध्यक्ष सूर्याजी राऊत, कोषाध्यक्ष सदानंद ठाकरे, संपर्क सचिव दिलीप वैद्य, पुंडलिक बाविस्कर, अरुण पुंड, श्रीमती बेबीताई रोडे यांचे विशेष सहकार्य लाभले. मंडळाचे उपाध्यक्ष सूर्याजी राऊत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

दिव्यांगांना रोजगार, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात प्राधान्य देण्यासाठी शासन कटिबद्ध : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दिव्यांगांना साहित्याचे निःशुल्क वाटप; दिव्यांगांना स्वावलंबी होण्यास मदत होणार

नागपूर : दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी आणि सक्षम करण्यासाठी आवश्यक सहाय्यक साधने उपलब्ध करून देण्याबरोबरच रोजगार, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात त्यांना प्राधान्य देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. दिव्यांगांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात येत आहे. सहाय्यक साधने उपलब्ध झाल्यामुळे दिव्यांग व्यक्तींच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी होऊन स्वावलंबी होण्यास मदत होणार आहे. दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी भविष्यातही अशा शिबिरांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि नागपूर महानगरपालिका, भगवान महावीर विकलांग सहायता समिती जयपूर, जिल्हा परिषद नागपूर व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर जिल्ह्यातील अस्थिव्यंग व कर्णबधिर दिव्यांग व्यक्तींसाठी निःशुल्क जयपूर फूट साहित्य व सहाय्यक साधने मोजमाप व वाटप शिबिर कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त व नियोजन राज्यमंत्री ?ड. आशिष जयस्वाल, महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड, आमदार संजय भेंडे, आ. राजीव पोतदार, आ. कृपाल तुमाने, आमदार चरणसिंग ठाकूर, आ. मोहन मते, मनपा सभापक्ष नेते नरेंद्र बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, माजी महापौर दयाशंकर तिवारी, सहसचिव (मुख्यमंत्री कार्यालय) आशा पठाण आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे बोलताना



म्हणाले की, दिव्यांग व्यक्तींच्या गरजेनुसार जयपूर फूट साहित्य तसेच विविध सहाय्यभूत साधनांचे मोजमाप करून त्यांचे निःशुल्क वितरण करण्यात आले. आवश्यक साधने मिळाल्यामुळे दिव्यांग व्यक्तींच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी होऊन त्यांना अधिक स्वावलंबी होण्यास मदत होणार आहे. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या या शिबिराला अपेक्षेपेक्षा मोठा प्रतिसाद मिळाला असल्याचे समाधान त्यांनी यावेळी व्यक्त केले. मुख्यमंत्री पुढे म्हणाले, मुख्यमंत्री कार्यालयातून दिव्यांगांसाठी अशा प्रकारचे शिबिर आयोजित करण्याची संकल्पना पुढे आली. त्यानंतर नागपूर महानगरपालिका स्तरावर आवश्यक तयारी करण्यात आली. भगवान महावीर विकलांग सहायता समितीने या आयोजनासाठी विशेष योगदान दिले आहे. ही समिती १९७५ पासून दिव्यांगांसाठी कार्यरत असून 'जयपूर फूट'च्या माध्यमातून दिव्यांगांच्या जीवनात मोठे परिवर्तन घडविण्याचे काम करीत असल्याचे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारकडून दिव्यांगांसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. राज्य शासनाकडूनही दिव्यांगांना आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दिव्यांगांसाठी मानधन २५०० रुपये करण्यात आले असून विविध योजनांच्या माध्यमातूनही त्यांना मदत केली जात आहे.

घरकुलासह अन्य शासकीय योजनांमध्ये दिव्यांगांना प्राधान्य कसे देता येईल, याबाबत शासन सकारात्मक प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. 'विकलांग'ऐवजी 'दिव्यांग' या सकारात्मक दृष्टिकोनातून त्यांच्या क्षमतांना संधी देणे आवश्यक आहे. दिव्यांगता कमी करण्यासाठी तसेच दिव्यांग व्यक्तींना सक्षम करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. दिव्यांग व्यक्तींच्या ऑक्स्ऑक कार्डसाठी झोननिहाय काम्काज करण्यात यावे, अशी सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली. दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी शासन भविष्यातही सातत्याने काम करीत राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

तत्पूर्वी, महापौर नीता ठाकरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी आयोजनाच्या यशस्वी वाटचालीची माहिती दिली. शिबिराच्या यशस्वी आयोजनाची माहिती देणारी ध्वनिचित्रफीतही यावेळी दाखविण्यात आली. भगवान महावीर विकलांग सहायता समितीचे पी. आर. मेहता यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तिरंगा वंदे मातरम प्रदर्शनाचे यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. प्रशांत उगेमुरे आणि डॉ. विजय कुमार शर्मा यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार मनपा सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर यांनी मानले.

४०० अंगणवाड्या झाल्या स्मार्ट

आणखी ११० अंगणवाड्यांचे रूपडे पालटणार : वाढत्या कॉन्व्हेंट क्रेझला पर्याय देण्याचा प्रयत्न

वर्धा : ग्रामीण भागातील चिमुकल्यांना आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहाशी जोडण्यासाठी जिल्ह्यातील अंगणवाड्यांचे रूपडे बदलण्यावर भर देण्यात येत आहे. वर्धा जिल्ह्यातील एकूण १ हजार ६२७ अंगणवाड्यांपैकी मागील चार वर्षांत तब्बल ४०० अंगणवाड्या स्मार्ट करण्यात आल्या आहेत. या स्मार्ट अंगणवाड्यांमुळे पारंपरिक शिक्षण पद्धतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाली असून, खेळातून शिक्षण घेण्याची संधी बालकांना उपलब्ध झाली आहे.

स्मार्ट करण्यात आलेल्या अंगणवाड्यांमध्ये एलईडी टीव्ही, डिजिटल शैक्षणिक साहित्य तसेच लहान मुलांच्या शैक्षणिक आणि बौद्धिक विकासाला पूरक विविध उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय अंगणवाडीतील दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक भांडी, गॅस शेगडी आदी साहित्याचीही पुरवठा करण्यात आला आहे. त्यामुळे अंगणवाडी केंद्रांचा केवळ बाह्य चेहरामोहरा बदलला नसून, बालकांना मिळणाऱ्या सुविधांमध्येही वाढ झाली आहे. तर जिल्ह्यात आणखी

मागील चार वर्षांत जिल्ह्यातील ४०० अंगणवाड्या स्मार्ट करण्यात आल्या आहेत. स्मार्ट झालेल्या या सर्व अंगणवाड्या ग्रामीण भागातील आहेत. तर सध्या ११० अंगणवाडी युद्धपातळीवर स्मार्ट करण्यावर भर दिला जात आहे.

मनिषा कुरसंगे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग, जि. प. वर्धा.

११० अंगणवाड्यांचे रूपडे बदलून त्यांना स्मार्ट करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या अंगणवाड्यांमध्येही आधुनिक शैक्षणिक साधने आणि बालकांना आकर्षित करणाऱ्या विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. त्यामुळे येत्या काळात जिल्ह्यातील स्मार्ट अंगणवाड्यांची संख्या आणखी वाढणार आहे. सध्या पालकांमध्ये कॉन्व्हेंट शाळांविषयी मोठ्या प्रमाणात आकर्षण निर्माण झाले आहे. आधुनिक सुविधा, ईंग्रजी माध्यम आणि डिजिटल शिक्षणामुळे अनेक पालकांचा कल कॉन्व्हेंटकडे वाढताना दिसतो. या पार्श्वभूमीवर अंगणवाड्यांमध्येही आधुनिक आणि आकर्षक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. रंगीबेरंगी साहित्य, खेळणी, डिजिटल साधने आणि विविध शैक्षणिक उपकरणांमुळे चिमुकल्यांना अंगणवाडीत येण्याची उत्सुकता निर्माण होत आहे.

मुलांना डिजिटल माध्यमातून शिकविण्यावर भर

स्मार्ट अंगणवाडीच्या माध्यमातून बालकांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता खेळ, कृती आणि डिजिटल माध्यमातून शिकविण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे मुलांमध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण होण्यास मदत होत आहे. शिवाय त्यांचा बौद्धिक, शारीरिक आणि सामाजिक विकास साधण्यासही हातभार लागत आहे. ग्रामीण भागातील बालकांना शहरातील शाळांप्रमाणेच आधुनिक शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने स्मार्ट अंगणवाडी उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे. उर्वरित अंगणवाड्यांही टप्प्याटप्प्याने स्मार्ट झाल्यास जिल्ह्यातील पूर्वप्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता आणखी उंचावण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

नवसंकल्प सेवा प्रतिष्ठानच्या वतीने समीर देशमुख यांचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन

शेतकऱ्यांच्या शेतरस्त्यांचा प्रश्न केंद्राच्या निदर्शनास, शेतात जाणारा रस्ता हा शेतकऱ्यांसाठी जीवनवाहिनी; बारमाही शेतरस्त्यांसाठी ठोस धोरणाची मागणी.

वर्धा : शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी आजही अनेक ठिकाणी कच्चा व मातीच्या रस्त्यांचा आधार घ्यावा लागत आहे. पावसाळ्यात या रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट होत असून चिखल, खड्डे आणि पाण्यामुळे शेतकऱ्यांना दररोज मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. या गंभीर प्रश्नाकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री मा. श्री. नितीनजी गडकरी यांना निवेदन सादर करण्यात आले.

शेतकऱ्यांसाठी शेतरस्ता हा केवळ ये-जा करण्याचा मार्ग नसून शेतीची यंत्रसामग्री, बियाणे, खते, औषधे शेतापर्यंत पोहोचविणे आणि शेतमाल बाजारपेठेत आणण्यासाठी अत्यावश्यक सुविधा आहे. रस्ता खराब असल्यामुळे शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्यांना अतिरिक्त वेळ, श्रम आणि आर्थिक नुकसान सहन करावे लागते.

विशेषतः पावसाळ्यात



अनेक शेतरस्ते वाहतुकीस पूर्णपणे अयोग्य होतात. त्यामुळे ट्रॅक्टर व इतर कृषी वाहने शेतापर्यंत पोहोचत नाहीत. परिणामी शेतकऱ्यांना शेतीची कामे वेळेत करणे कठीण होते आणि त्याचा थेट परिणाम त्यांच्या उत्पादनावर व उत्पन्नावर होतो. या पार्श्वभूमीवर मुख्य रस्त्यापासून शेतापर्यंत जाणाऱ्या शेतरस्त्यांचे सर्वेक्षण करून त्यांचे मजबुतीकरण, खडीकरण तसेच आवश्यकतेनुसार पक्क्या व बारमाही रस्त्यांमध्ये रूपांतर करण्यासाठी शासनाने विशेष योजना आखावी, अशी मागणी नवसंकल्प सेवा प्रतिष्ठानच्या वतीने समीर देशमुख यांनी निवेदनाद्वारे करण्यात आली.

केंद्र सरकारच्या विविध ग्रामीण व पायाभूत सुविधा योजनांच्या माध्यमातून अशा रस्त्यांसाठी निधी व तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देता येईल का, याबाबतही सकारात्मक विचार करून संबंधित राज्य शासन व प्रशासनाला आवश्यक दिशा-निर्देश देण्यात यावेत, अशी विनंती करण्यात आली.

'शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत रस्ता पोहोचला, तर शेतीच्या विकासाला खरी गती मिळेल' या भूमिकेतून हा प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आला असून, याबाबत पुढील काळातही सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्धार समीर देशमुख यांनी व्यक्त केला.

शेतकऱ्यांच्या मूलभूत सुविधांसाठी आवाज उठवणे आणि त्यांच्या प्रश्नांना शासनाच्या सर्वोच्च स्तरापर्यंत पोहोचवणे, हीच नवसंकल्प सेवा प्रतिष्ठानची निवेदनामागची भूमिका असल्याचे समीर देशमुख यांनी सांगितले.

क्षुल्लक कारणातून जीवे मारण्याचा प्रयत्न

वर्धा : क्षुल्लक कारणातून व्यक्तीवर प्राणघातक हल्ला करत जीवे मारण्याचा प्रयत्न केला. ही घटना देहेगाव (मिस्कीन) येथे ८ ऑगस्ट रोजी घडली.

प्रफुल्ल उईके रा. देहेगाव (मिस्कीन) असे जखमीचे नाव आहे. देहेगाव (मिस्कीन) येथे क्षुल्लक कारणातून अविनाश ससाने रा. देहेगाव मिस्कीन, सुजित नेहारे रा. पिपरी (मेघे), विवेक पलटणकर, रा. वर्धा या तिघांविरोधात गुन्हा दाखल केला.

पलटणकर, रा. वर्धा या तिघांनी प्रफुल्ल उईके यास मारहाण केली. तसेच चाकूनेही वार केला. मारहाण करत जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. याप्रकरणी तक्रारीवरून सावंगी (मेघे) पोलिसांनी अविनाश ससाने रा. देहेगाव मिस्कीन, सुजित नेहारे रा. पिपरी (मेघे), विवेक पलटणकर, रा. वर्धा या तिघांविरोधात गुन्हा दाखल केला.

नेहा बोरा यांच्यावर शाई फेकण्यात आल्याच्या घटनेचा भीम टायगर सेना व रिपाइं (आंबेडकर) तर्फे तीव्र निषेध!

वर्धा : झारखंडमध्ये नेहा बोरा यांच्यावर शाई फेकण्यात आल्याच्या घटनेचा आज दिनांक ११ ऑगस्ट रोजी वर्धा जिल्हा भीम टायगर सेना व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) तर्फे तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

भीम टायगर सेनेचे जिल्हा प्रमुख विशाल रामटेके व कार्यकर्त्यांनी तसेच रिपाइं (आंबेडकर) चे जिल्हा अध्यक्ष महेंद्र मुनेश्वर यांनी या घटनेचा तीव्र निषेध करत ही घटना भाजपच्या कथित दबावाच्या राजकारणाचे तसेच धर्माधतेच्या कुटील कारस्थानातून घडविण्यात आली असून देशात विद्यार्थ्यांचे आंदोलन योग्य दिशेने सुरू असताना हेतुपुरस्सर सुडबुद्धीने नेहा बोरा यांच्यावर शाही फेकण्यात आली.



केंद्र सरकारच्या दडपशाही धोरणातून विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला दाबण्याचा प्रयत्न केल्या जात आहे.परंतु विद्यार्थी व जेन^ तरुणांच्या आंदोलनाची धार देशात आणखी तीव्र होईल, असे जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

यावेळी जिल्हाधिकारी यांना निवेदन देताना पंकज लभाणे, बंडु फुलमाली, अमित नाईक, बाबा बडगे, राहुल पिंपलकर, राकेश पांडे, कन्हैया उईके, सुमित गजबिये, अमित गजभिये, रोहित यादव, सिद्धार्थ मेश्राम, सचिन वासनिक, स्वप्नील दिवे, आशिष दिघाडे, प्रशांत रामटेके, शिधांत मून, विकास झांझाल, चांद खा पठाण, नयन रामटेके, आकाश खरे, निषाद शेख, सोनू शहारे, सुंदर, आकाश लोणारे, उत्कर्ष वालमंचुरे, प्रकाश कोरडे आदींची उपस्थिती होती.

१० ऑगस्टला आयटक संघटनेचा जेलभरो आंदोलन ९८७ महिला पुरुषांना अटक व सुटका

वर्धा : महाराष्ट्रातील अंगणवाडी कर्मचारी, शालेय पोषण आहार कर्मचारी, अंशकालीन स्त्री परिचर तसेच आशा व गटप्रवर्तक बाधकाम कामगार यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवार, १० ऑगस्ट रोजी राज्यव्यापी जेलभरो आंदोलन आयटक राज्य सचिव दिलीप उटाणे जिल्हा याच्या नेतृत्वात करण्यात आले.

दयाल नगर रेल्वे स्टेशन येथून मोर्चा काढून बजाज चौक बजाज चौक येथे जेलभरो करण्यात आले

अत्यल्प मानधनावर वर्षानुवर्षे शासनाच्या विविध योजना राबविणाऱ्या या कर्मचाऱ्यांना किमान वेतन, सेवासुरक्षा, सामाजिक सुरक्षा, पेन्शन, ग्रॅच्युइटी, भविष्य निर्वाह निधी व शासकीय सेवेत समावेश यांसह विविध मागण्यांसाठी हा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य आणि शालेय शिक्षण विभागाच्या विविध योजना तळागाळा पर्यंत पोहोचविण्यात या कर्मचाऱ्यांची महत्त्वाची भूमिका आहे. मात्र, वाढत्या महागाईच्या तुलनेत त्यांना मिळणारे मानधन अत्यल्प असून अनेक वर्षांपासून त्यांच्या मागण्या प्रलंबित आहेत. त्यामुळे शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या

ड अंगणवाडी सेविका व मदतनीसांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ग्रॅच्युइटीचा लाभ लागू करावा दरमहा सन्मानजनक पेन्शन द्यावी, गेल्या अनेक वर्षांपासून मानधनात झालेली अपुरी वाढ दूर करून किमान वेतनाच्या धर्तीवर मानधन लागू करावे, अशा प्रमुख मागण्या आहेत.

याशिवाय आजारपणाची रजा, आकस्मिक रजा व प्रसूती रजा लागू करावी, राज्य शासनाकडून मिळणारा प्रोत्साहन भत्ता मानधनामध्ये वर्ग करावा, अंगणवाडी पर्यवेक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत, इइ, विमा व सामाजिक सुरक्षा लागू करावी तसेच अतिरिक्त शासकीय कामासाठी स्वतंत्र मानधन द्यावे, अशीही मागणी आहे.

शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर

शालेय पोषण आहार योजना प्रभावीपणे राबविणाऱ्या स्वयंपाकी व मदतनीस कर्मचाऱ्यांना अत्यल्प मानधनावर काम करावे लागत आहे. त्यामुळे किमान वेतन लागू करावे आणि मानधनात तातडीने वाढ करून दरमहा किमान २१ हजार रुपये द्यावेत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना शासकीय



अथवा जिल्हा परिषद सेवेत समाविष्ट करून चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा, इइ, ग्रॅच्युइटी, पेन्शन, विमा व सामाजिक सुरक्षा लागू करावी, आजारपणाची व आकस्मिक रजा तसेच महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजा द्यावी, मानधन वेळेवर अदा करावे, स्वयंपाकासाठी आवश्यक गॅस, इंधन, भांडी व इतर साहित्य नियमित उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी आहे

अंशकालीन स्त्री परिचरांना २६ हजार रुपये वेतनाची मागणी

अंशकालीन स्त्री परिचर हे आरोग्य विभागाच्या कामकाजात महत्त्वाची भूमिका बजावत असून अत्यल्प मानधनावर सेवा देत आहेत. त्यामुळे अंशकालीन स्त्री परिचरांना दरमहा २६ हजार रुपये किमान वेतन द्यावे, अशी प्रमुख मागणी आहे.

या कर्मचाऱ्यांना शासकीय अथवा जिल्हा परिषद सेवेत चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून समाविष्ट करावे, सध्या मिळणारे अत्यल्प मानधन तातडीने वाढवावे, आजारपणाची व इतर आवश्यक रजा लागू कराव्यात, इइ, ग्रॅच्युइटी, पेन्शन, विमा व सामाजिक सुरक्षा लागू करावी तसेच सेवाज्येष्ठतेनुसार लाभ द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

आशा व गटप्रवर्तकांच्या मागण्याही तीव्र

राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागात आरोग्यविषयक सेवा पोहोचविणाऱ्या आशा व गटप्रवर्तकांच्या मागण्यांकडेही शासनाने गांभीर्याने पाहावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

आशा व गटप्रवर्तकांना किमान वेतन लागू करावे, प्रोत्साहनाधारित मानधनाऐवजी निश्चित मासिक वेतन द्यावे, अशी मागणी आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत दहा वर्षपिक्षा अधिक सेवा केलेल्या गटप्रवर्तकांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे, जुन्या आशा कर्मचाऱ्यांच्या सेवासंबंधी वयोमर्यादा ६५ वर्षे करावी, इइ, ग्रॅच्युइटी, विमा, पेन्शन व सामाजिक सुरक्षा लागू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

आशा व गटप्रवर्तकांना आजारपणाची रजा, आकस्मिक रजा, प्रसूती रजा व अर्जित रजा लागू करावी, सेवासुरक्षा द्यावी, मनमानी पद्धतीने सेवा समाप्ती बंद करावी आणि शासनाच्या अतिरिक्त कामासाठी स्वतंत्र मानधन द्यावे, अशीही मागणी आहे.

'काम नियमित, मग वेतन आणि सुविधा का नाही?'

वर्षानुवर्षे शासनाच्या विविध योजना राबविणाऱ्या या कर्मचाऱ्यांकडून नियमित स्वरूपाचे काम करून घेतले जाते. मात्र त्यांना कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन व सामाजिक सुरक्षा दिली जात नाही. त्यामुळे 'काम नियमित घेतले जाते, तर वेतन आणि सामाजिक सुरक्षा नियमित का नाही?' असा सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला आहे.महागाईच्या काळात अत्यल्प मानधनावर कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अशक्य होत असून, शासनाने केवळ आश्वासने न देता ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

राज्यव्यापी जेलभरो आंदोलनाचा इशारा

या सर्व मागण्यांबाबत शासनाने तातडीने बैठक घेऊन निर्णय घ्यावा. किमान वेतन, सेवासुरक्षा, सामाजिक सुरक्षा, पेन्शन, इइ, ग्रॅच्युइटी आणि शासकीय सेवेत समावेश या मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संघटनांनी दिला आहे.

१० ऑगस्टच्या जेलभरो आंदोलनाच्या माध्यमातून सरकारचे लक्ष या लाखो कर्मचाऱ्यांच्या न्याय्य प्रश्नांकडे वेधण्यात येणार असून, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे संघटनांनी सांगितले.'शासनाच्या योजना राबविणाऱ्या कर्मचाऱ्यांना सन्मानजनक वेतन व सामाजिक सुरक्षा मिळालीच पाहिजे. आश्वासनांपेक्षा आता शासनाने निर्णय घेण्याची वेळ आली आहे,' अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.